मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी




■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १५५ ■ गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## नवीन पनवेल येथे रोजगार मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : आदर्श शैक्षणिक समूहाच्या प्रांगणात भविष्याला दिशा देणारा, स्वप्नांना बळ देणारा आणि तरुणाईच्या आशांना नवे आकाश देणारा भव्य रोजगार मेळावा उत्साहात संपन्न झाला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी,आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल आणि युवा शक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा उपक्रम म्हणजे केवळ नोकऱ्यांचे व्यासपीठ नव्हे, तर युवकांच्या कर्तृत्वाला आकार देणारा प्रेरणास्रोत ठरला. या कार्यक्रमास निरंजन डावखरे, आमदार, विधानपरिषद, कैलाश मोरे (य.च.म.मु.वि., नाशिक), डॉ. सतीश पवार, डायरेक्टर, युवा शक्ती फाउंडेशन, वामन नाखले, विभागीय संचालक, मुंबई विभागीय केंद्र, य.च.म.मु. वि., नाशिक, प्रशांत कांबळे, संगीता विसपुते तसेच विविध क्षेत्रांतून आलेले उद्योजक, कंपनी प्रतिनिधी, पालक व हजारो युवक, युवती उपस्थित होते.या मेळाव्यासाठी ५० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. दिवसभर झालेल्या मुलाखतींमधून असंख्य युवकांना रोजगाराची संधी प्राप्त झाली, तर अनेक उमेदवारांना तात्काळ ऑफर लेटर देण्यात आले हा क्षण अनेक कुटुंबांसाठी



आशेचा आणि अभिमानाचा ठरला. नामांकित कंपन्यांची थेट उपस्थिती, कौशल्यविकास व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावरील मार्गदर्शनपर सत्रे यामुळे युवकांना नवी दिशा व आत्मविश्वास मिळाला. संधी, मार्गदर्शन, आत्मविश्वास या त्रिसूत्रीवर उभा राहिलेला हा मेळावा अनेकांच्या आयुष्यातील नवे वळण ठरला. नोकरी ही अंतिम टप्पा नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे कौशल्य, शिस्त व निष्ठा यांवरच खरे यश उभे राहते हा संदेश या व्यासपीठातून अधोरेखित झाला. महिला व दिव्यांगांसाठी समान संधी, अप्रेंटिसशिप व ऑन-जॉब ट्रेनिंग, स्टार्टअप व स्वयंरोजगार, डिजिटल साक्षरता आणि उद्योग–महाविद्यालय समन्वय यांसारख्या विषयांवर झालेल्या मंथनातून सशक्त व उद्यमशील महाराष्ट्राचे स्वप्न अधिक तेजस्वी झाले.

## मुंबईचा मराठी महापौर विराजमान झाला; विकासाचा नवा संकल्प जाहीर केला

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** मुंबई महानगरपालिकेच्या नव्या महापौरांनी बुधवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारताच पालिका मुख्यालयात उपस्थिती लावली. पदग्रहणानंतर त्यांनी सर्वप्रथम मुंबई महानगरपालिका पत्रकार कक्षाला भेट देत पत्रकारांच्या हस्ते सत्कार स्वीकारला. यावेळी पत्रकार कक्षाचे अध्यक्ष मारुती मोरे, उपाध्यक्ष सचिन धानजी, इंद्रायणी नार्वेकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत बोलताना महापौरांनी आपल्या पुढील वाटचालीचा आराखडा मांडला. “केंद्रात, राज्यात आणि मुंबई महानगरपालिकेत



आमचेच सरकार असल्याने विकासकामांना वेग मिळेल. गोरगरीब जनतेला न्याय आणि मदत देणे हे आमचे प्राधान्य राहील,” असे त्यांनी स्पष्ट केले.

उपनगरांमध्ये मेडिकल कॉलेज सुरू करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. तसेच मुंबईतील रुग्णालयांच्या दर्जात सुधारणा करून राजावाडी रुग्णालय ‘एम्स’च्या धर्तीवर विकसित करण्याचा संकल्प त्यांनी मांडला. पालिकेच्या शाळांमध्येही गुणवत्तावाढीसाठी ठोस पावले उचलली जातील, असे त्यांनी सांगितले.

मुंबईतील बेकायदेशीर बांगलादेशी फुटपाथ फेरीवाल्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला. “२२ वर्षे जनतेत रस्त्यावर जाऊन काम केले आहे; तेच काम आता महापौर म्हणून करणार,” असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मुंबई व राज्याने प्रगती केली असून, पूर्वीच्या सत्ताकाळात अनेक प्रकल्प स्थगित होते, असा आरोपही त्यांनी केला. “बोलल्याप्रमाणे देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईला मराठी महापौर दिला,” असेही त्या म्हणाल्या.

मुंबई पावसाळ्यात तुंबणार नाही, यासाठी नालेसफाई व पायाभूत सुविधांवर भर दिला जाईल. मराठी माणूस, मराठी शाळा आणि कर भरणाऱ्या मुंबईकरांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सत्कार स्वीकारताना त्यांनी आवाहन केले की, “शाल-फुलांचा सत्कार करू नका; त्या ऐवजी महापौर निधीत आर्थिक मदत करा. हा निधी गरजू नागरिकांसाठी वापरण्यात येईल.”नव्या महापौरांच्या घोषणांमुळे पालिकेच्या कारभाराला नवी दिशा मिळणार का, याकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

## पंडित दीनदयाल उपाध्याय जयंतीनिमित्त खेड-आळंदी विधानसभेत अभिवादन कार्यक्रम



**दैनिक युवक आधार**

**खेड-आळंदी (प्रतिनिधी) :** भारतीय जनता पक्षाच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. खेड-आळंदी विधानसभेत आयोजित या कार्यक्रमास पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य किशोर आण्णा कुमठेकर यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारसरणीवर प्रकाश टाकला. अंत्योदयाचा विचार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. “सबका साथ, सबका विकास” ही केवळ घोषणा नसून शासनाच्या विविध योजना समाजातील तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपा कार्यकर्ते सातत्याने प्रयत्नशील आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला भाजपा पुणे जिल्हा सचिव अभय काळे, गणेश गुंडाळ, शांताराम गाडेकर, भानुदास कोहिनकर, दीपक नितनवरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी अभय काळे यांनी आभार प्रदर्शन करत शासनाच्या विकास योजनांचा लाभ वाडी-वस्तीपर्यंत पोहोचवण्याचा विश्वास व्यक्त केला.

## मूल्यवर्धन उपक्रम, यशाचा मार्ग: मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून शांतीलाल मुथा फाउंडेशनचे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी दैनिक युवक आधार :** जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या 'मूल्यवर्धन' उपक्रमाला शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल आणि सकारात्मक बदलांबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांनी समाधान व्यक्त केले असून, या प्रवासात मोलाची साथ देणाऱ्या शांतीलाल मुथा फाउंडेशनचे विशेष आभार मानले आहेत.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर भर

शालेय वयातच विद्यार्थ्यांवर लोकशाही मूल्यांचे संस्कार व्हावेत आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने मूल्यवर्धन कार्यक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढला असून त्यांच्या वागणुकीत सकारात्मक बदल दिसून येत असल्याचे निरीक्षण मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नोंदवले. "केवळ पुस्तकी ज्ञान न देता, मूल्यांची रुजवणूक करणे ही काळाची गरज आहे आणि मूल्यवर्धन हे काम प्रभावीपणे



करत आहे," असे त्यांनी नमूद केले.

शांतीलाल मुथा फाउंडेशनचा मोलाचा वाटा

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी 'शांतीलाल मुथा फाउंडेशन'ने (SMF) दिलेले तांत्रिक सहकार्य, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक साहित्य अत्यंत उपयुक्त ठरले आहे. फाउंडेशनच्या मार्गदर्शनामुळेच दुर्गम भागातील शाळांपर्यंत हा कार्यक्रम पोहचू शकला, याबद्दल प्रशासनाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

फाउंडेशनतर्फे शिक्षकांना विशेष कृतीशील प्रशिक्षण.

विद्यार्थी सहभाग: वर्गातील निर्णय प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग.

पारदर्शक मूल्यमापन: उपक्रमाच्या प्रगतीचा नियमित आढावा.

या यशामुळे आगामी काळात हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला आहे. मूल्यवर्धन उपक्रमाच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात जिल्ह्याचा नावलौकिक वाढत आहे. डॉ विवेक गायकवाड साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी हिंगोली व सोनटक्के साहेब शिक्षणाधिकारी (मा) हिंगोली यांचे कडे

मूल्यवर्धन जिल्हा आढावा सादर करण्यात आला हा सादर करताना मूल्यवर्धन चे

क्षितिजा बोथीकर मास्टर ट्रेनर व विजय खुडे मूल्यवर्धन तालुका समन्वयक कळमनुरी हे यांनी सादरीकरण केले

**उपक्रमाच्या प्रगतीचा नियमित आढावा**

या यशामुळे आगामी काळात हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला आहे. मूल्यवर्धन उपक्रमाच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात जिल्ह्याच नावलौकिक वाढत आहे. डॉ विवेक गायकवाड साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी हिंगोली*

## दिल्लीतील निवासस्थानी खासदार डॉ प्रशांत पडोळे यांची महामाया महिला संघटनेने घेतली भेट



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/दिल्ली :** महामाया महिला सामाजिक न्याय संघटना यांनी महिलांच्या समस्येवर खासदार डॉ प्रशांत पडोळे यांनी यांचे भेट घेऊन महिलांच्या विविध समस्या विषयी चर्चा केली

याप्रसंगी महामाया महिला सामाजिक न्याय संघटनेचे संस्थापक डी जी रंगारी, महामाया महिला सामाजिक न्याय संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष शितल नागदेवे, महाराष्ट्र महिला सामाजिक न्याय संघटनेचे महाराष्ट्राचे सदस्य स्वर्णमाला गजभिये ,साकोली तालुका महिला अध्यक्ष कल्पना सांगोडे, कमला रंगारी ,प्रतिमा राऊत भूमिका उके व संघटनेचे इतर महिला पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते

## मुदखेड तालुक्यात तीन केंद्रांवर ९८२ विद्यार्थ्यांची बारावी परीक्षा शांततेत सुरू

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी/ प्रकाश गवारे** : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षांना १० फेब्रुवारीपासून मुदखेड तालुक्यात सुरुवात झाली असून परीक्षा शांत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडत आहे. तालुक्यातील एकूण तीन परीक्षा केंद्रांवर मिळून ९८२ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

केंद्र क्रमांक २५१ महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय, मुदखेड येथे केंद्र संचालक ए. के. जाधव यांच्या देखरेखीखाली २१२ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. केंद्र क्रमांक २५२ राजर्षी शाहू उच्च माध्यमिक विद्यालय, मुदखेड येथे प्राचार्य व्ही. बी.



सर यांच्या मार्गदर्शनाखाली २०० परीक्षार्थी सहभागी झाले आहेत. तर तालुक्यातील सर्वाधिक ५०० विद्यार्थ्यांसह केंद्र क्रमांक २५४ शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, बारड येथे केंद्र संचालक पी. पी. शिवे यांच्या नेतृत्वाखाली परीक्षा सुरू आहे.

परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी प्रभारी गट शिक्षणाधिकारी सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाकडून सर्व परीक्षा केंद्रांची पाहणी करण्यात आली. पर्यवेक्षकांची नियुक्ती, आवश्यक खबरदारी आणि सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यावर्षीपासून तिन्ही परीक्षा केंद्रांवरील प्रत्येक वर्गखोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून त्याद्वारे परीक्षेवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी परीक्षेबाबत विशेष लक्ष देत जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष सुरू केला आहे. महसूल, शिक्षण व पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांना ‘जूस ॲप’द्वारे परीक्षेसंदर्भातील माहिती सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.तहसीलदार डॉ. आनंद देडगावकर, नायब तहसीलदार संतोष कामठेकर तसेच शिक्षण विभागाच्या भरारी पथकातील शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती वैशाली आडगावकर, संजय माहुरकर,

विजयकुमार बांके व आर. आर. माळेगावकर यांनी तिन्ही केंद्रांना भेट देऊन पाहणी केली.परीक्षार्थ्यांनी नियमांचे काटेकोर पालन करून प्रामाणिकपणे परीक्षा द्यावी, असे आवाहन प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुरेश पाटील यांनी केले आहे.

## पिल्लई विद्यापीठाचा उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते भव्य उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल/वार्ताहर :** नवीन पनवेल येथे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पिल्लई विद्यापीठाचा भव्य उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या ऐतिहासिक क्षणी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, पनवेल पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, प्राचार्य एस जोशी, डॉक्टर निवेदिता श्रेयस यांच्यासह विद्यापीठाचे प्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकवर्ग उपस्थित होते.

उद्घाटनापूर्वी मान्यवरांनी विद्यापीठ परिसराची पाहणी करत अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, प्रयोगशाळा, संशोधन केंद्रे तसेच विद्यार्थ्यांच्या नवोपक्रम व स्टार्टअप उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी बोलताना मंत्री चंद्रकांतदादा



पाटील म्हणाले की, “पिल्लई विद्यापीठ हे केवळ शिक्षण देणारे केंद्र नसून, संशोधन, नवकल्पना आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून ‘विकसित भारत २०४७’च्या दिशेने देशाला घडवणारे विद्यापीठ ठरेल. महात्मा एज्युकेशन सोसायटीने प्रवर्तित केलेल्या पिल्लई विद्यापीठ नवी मुंबईचे औपचारिक उद्घाटन 10 फेब्रुवारी रोजी डॉ. के एम वासुदेवन पिल्लई कॅम्पस नवीन पनवेल येथे पार पडले. पिल्लई विद्यापीठ हे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा आहे ज्यामध्ये जागतिक शैक्षणिक सहकार्य, संशोधन केंद्रित शिक्षण, तंत्रज्ञान सक्षम शिक्षण आणि विकसित भारत 2047 सारख्या राष्ट्रीय प्राधान्यांशी सुसंगत कौशल्य विकास यावर लक्ष केंद्रित केले आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पिल्लई विद्यापीठ मोलाचे कार्य करेल, तसेच संशोधन आणि गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणासाठी हे विद्यापीठ एक महत्त्वाचे केंद्र ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नवीन पनवेल व परिसराच्या शैक्षणिक, सामाजिक आणि बौद्धिक प्रगतीसाठी हे विद्यापीठ नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे. महात्मा एज्युकेशन सोसायटी तीन हजार पेक्षा अधिक लोकांना रोजगार प्रदान करते आणि दरवर्षी 30 हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षण देते. दर्जेदार शिक्षणाद्वारे राष्ट्र उभारणीचे त्यांचे ध्येय पुढे चालू ठेवते.

# चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलच्या 1976 बॅचचे स्नेहसंमेलन

**दैनिक युवक आधार**

**मुबंई प्रतिनिधी :** चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलच्या 1976 च्या बॅचचे स्नेहसंमेलन 7 फेब्रुवारी 2026 रोजी शाळेच्या वागळे सभागृहामध्ये संपन्न झाले . भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश श्री भूषण गवई साहेब हे देखील या बॅचचे माजी विद्यार्थी नात्याने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

कार्यक्रमाला इजराइल, युरोप, अमेरिका इत्यादी देशातूनही विद्यार्थी आले होते. कार्यक्रमाला त्यावेळच्या त्यांच्या शिक्षिकांना ,सरांना आवर्जून आमंत्रण दिले गेले होते .यातील काही शिक्षक उपस्थित होते परंतु काही वयोमानपरत्वे येऊ शकले नाहीत परंतु त्यांनी चल चित्रांद्वारे आपल्या शुभेच्छा मुलांना पाठवल्या होत्या.

त्या काळात शाळेच्या समोरील हरीचे दुकान हे सगळ्या विद्यार्थ्यांचे आवडते ठिकाण होते. यात दुकानात मिळणारे चिंचा, बोरे, आवळा, बडीशेप, लिंबाच्या गोळ्या लोकप्रिय होत्या. विद्यार्थ्यांनी असा स्टॉलच वागळे सभागृहाच्या बाहेर मांडला होता. सकाळी साडेदहा वाजता माजी सरन्यायाधीश श्री भूषण गवई



साहेबांचे आगमन झाले .त्यांना शाळेच्या एनसीसी बटालियन तसेच शाळेच्या मुलींच्या बँडच्या वतीने मानवंदना देण्यात आली. त्यानंतर कार्यक्रम सुरू झाला. सर्व माजी विद्यार्थी विद्यार्थिनी अतिशय भावुक झाले होते. त्यांच्या आज हयात नसलेल्या साथीदारांना तसेच शिक्षकांना त्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच श्रद्धांजली वाहिली व नंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. शाळेचे ब्रीदवाक्य असलेले शीलम परं भूषणम् हे गीत सर्वांच्याच हृदयाला स्पर्श करून गेले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेला माजी विद्यार्थ्यांकडून अत्याधुनिक म्युझिक सिस्टीम भेट देण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती संचिता गावडे मॅडम यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी जमवलेला एक लाख पंच्याहत्तर हजार रुपयांचा धनादेश चिकित्सक समूहाचे सचिव डॉ गुरुनाथ पंडित सर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. डॉक्टर गुरुनाथ पंडित सर यांनी हा धनादेश बँकेत कायमस्वरूपी ठेव म्हणून ठेवून येणाऱ्या व्याजात तेवढेच व्याज चिकित्सक समूहातर्फे मिळवून येणाऱ्या रकमेतून दर 24 नोव्हेंबरला एका होतकरू विद्यार्थी व विद्यार्थिनीला पुरस्कृत केले जाईल अशी घोषणा केली 24 नोव्हेंबर हा माजी सरन्यायाधीश श्री भूषण गवई सरांचा वाढदिवस आहे.

शाळेचे विविध उपक्रम सुरू आहेत जसे गतवर्षी 27 फेब्रुवारीला शाळेने केलेल्या जागतिक 1000 गाण्यांचा इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड, मुलांना साहित्यिक किंवा कवी बनवण्यासाठी प्रोत्साहन मिळावे याकरता सुरू असलेला अजब गजब या त्रैमासिकाचा उपक्रम, तसेच यावर्षीच्या मराठी भाषा गौरव दिनाला संत साहित्य हा मराठी भाषेचा भक्कम पाया याविषयी होणाऱ्या पुढील कार्यक्रमाबद्दल अवगत केले गेले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. अवधूत गोखले,श्री अविनाश पाठक, श्री नितीन आंबर्डेकर यांनी विशेष सहभाग घेतला श्री. विनायक जोशी यांनी शाळेच्या संदर्भामध्ये सुंदरशी ध्वनि चित्रफीत बनवली.

सदर कार्यक्रमाच्या नियोजनासाठी सौ. जोस्ना म्हात्रे,माधुरी गोखले,सुबोध पालकर,मोहन नारकर राजीव गोविलकर, संजय होनाळे यांनी करमणुकीच्या कार्यक्रमाचे नियोजन खूप उत्कृष्टपणे केलं.

सर्व जुन्या नव्या आठवणींची छानशी सांगड सतीश सराफ यांनी घातली. सर्व मित्र-मैत्रिणींच्या जुन्या आठवणी त्यांनी आपल्या निवेदनात खास करून उल्लेख केल्या.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय पुण्यतिथी निमित्त लासलगाव येथे "समर्पण दिवस" साजरा



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी महेश साळुंके :** राष्ट्रीय अध्यक्ष मा.श्री. नितीन नबीनजी यांच्या निर्देशानुसार, लासलगाव भाजपा मंडल तर्फे लासलगाव ..श्री गणेश मंदिर येथे आज ११ फेब्रुवारी २०२६ रोजी भाजपा सरचिटणीस नाशिक जिल्हा उत्तर सौ सुवर्णा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आज समर्पण दिवसाचे आयोजन करण्यात आले. लासलगाव मंडल अध्यक्ष निलेश सालकाडे,भाजपा शहराध्यक्ष श्री. शेखर होळकर, उपाध्यक्ष श्री राजेंद्र चाफेकर,ज्येष्ठ नेते दत्तुलालजी शर्मा यांनी प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरवात केली. सुवर्णा जगताप यांनी आपले मनोगत मांडताना पंडित दीनदयाळ उपाध्याय हे एकात्म मानववाद आणि अंत्योदय विचारांचे होते. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडली..दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन, दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय शहरी आजीविका मिशन, दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल योजना , दीन दयाल उपाध्याय ग्राम ज्योति योजना, दीन दयाल उपाध्याय अंत्योदय परिवार सुरक्षा योजना या योजना सरकारद्वारे राबविल्या जातात .. यावेळी भाजपा उपाध्यक्ष श्री राजेंद्रजी चाफेकर यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे जीवन, योगदान आणि अविभाज्य मानवतावाद यावर आपले विचार मांडले. यावेळी मंडल अध्यक्ष निलेश सालकाडे, निलेश जगताप, निलेशबापू लचके, मनीष चोपडा, सचिन लचके, लक्ष्मण खलसे, सोमनाथ गांगुर्डे, अयाज शेख, संतोष राजोळे, कैलास बोराडे, अनिल भावसार, भूपेंद्र दगडे,राजू सुरसे,अयाज शेख,भगवान बोरहाडे,शैलजा भावसार, नंदा शर्मा,रंजना शिंदे, उषा कुमावत, रूपा केदारे, योगिता आंबेकर, मंजुषा केंगे तसेच सर्व भाजपा बूथ प्रमुख, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ई–केवायसी पूर्ण करण्याची तहसीलदार सुमन मोरे यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना शासनाव्दारे वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीसाठी (अवकाळी पाऊस / अतिवृष्टी / अवर्षण /दुष्काळ इ.) निविष्ठा अनुदानाच्या स्वरुपात मदत जाहीर करण्यात येत असते. तालुक्यात सन २०२५ ते २०२६ या कालावधीत मोठ्या प्रमाणात अवेळी पाऊस/ गारपीट /अतीवृष्टी व वादळी वारे यामूळे शेतकरी यांच्या शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामूळे शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे शेतीपिकांसाठी अनुदान मंजूर झाले असून सदर अनुदान ई पंचनामा पोर्टलव्दारे पूर्ण केल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात वाटप करण्यात येते. परंतू आज १ ते २ वर्षाचा कालवधी होवून देखील ६६४८ पेक्षा अधिक ई केवायसी प्रलंबीत असल्याचे दिसून येते. ज्यामूळे शेतकऱ्यांना मुदतीत अनुदानाचे वाटप होत नाही. सदर प्रलंबित ई केवायसी १०० % पूर्ण होणे आवश्यक आहे.

जेणेकरुन संबंधीत शेतकरी यांना अनुदान वितरीत होण्यास सुलभहोईल. त्या अनुषंगाने मंठा तालूक्यातील सर्व शेतकरी यांना आवाहन करण्यात येते की, तहसिल कार्यालयाकडून सर्व महा ई सेवा

केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र तसेच सेतू सुविधा केंद्र यांना तालुक्यातील ई-केवायसी पेंडींग असणाऱ्या शेतकऱ्यांची यादी पुरविण्यात आलेली असून स्थानिक स्तरावरील कर्मचारी यांना गावामध्ये चावडीवर यादी चिटकवून, दवंडी देऊन, मौखिक तसेच व्हॉटस्ॲपव्दारे माहिती प्रसारीत करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच तहसिल कार्यालयाने गावनिहाय ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी ग्राम महसुल अधिकारी / ग्राम पंचायत अधिकारी यांना गावातील ग्रामपंचायत स्तरावर कॅम्प आयोजित करुन ई-केवायसी प्रलंबीत राहिलेल्या शेतकऱ्यांकडून कॅम्प मध्ये उपस्थित राहून केवायसी पूर्ण करून घेण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. तरी शेतकऱ्यांनी आपल्या नजीकच्या महा ई सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. जर संबंधीत शेतकरी यांनी विहित मुदतीत ई-केवायसी पूर्ण केली नाही व त्यामुळे तो अनुदानापासून वंचित राहिल्यास त्यास सर्वस्वी सदर शेतकरी जबाबदार राहिल. तरी सर्व शेतकरी बांधवांनी तात्काळ प्रलंबित ई-केवायसी पूर्ण करावी व शासनास सहकार्य करावे असे तहसिलदार सुमन मोरे मंठा यांनी आवाहन केले आहे.

## वाशिममध्ये विज्ञानाचा महाकुंभ! कुतूहल प्रदर्शनीने ४० हजार विद्यार्थ्यांना दिली वैज्ञानिक दृष्टिकोनाची नवी दिशा”

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम विज्ञान भारती, नागपूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित ‘कुतूहल विज्ञान प्रदर्शनी’ने वाशिम जिल्ह्यात इतिहास घडविला आहे. जिल्हाभरातून जवळपास ४० हजार विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनीला भेट देत विज्ञानाची प्रत्यक्ष अनुभूती घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला असून हा जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

दि. ८ फेब्रुवारी रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या समारोपीय कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, आयएमए अध्यक्ष डॉ. वसंत खडतकर, विवस्वान हेंबाळकर, विज्ञान





प्रदर्शनीचे उपाध्यक्ष डॉ. हरीश बाहेती, वाशिम अर्बन बँकेच्या अध्यक्षा शीलाताई राठी, कुतूहलचे मुख्य समन्वयक रोहित गनोरकर, विज्ञान भारतीचे नरेंद्र सातफळे, विदर्भ कोषाध्यक्ष गिरीश जोशी, शिक्षणाधिकारी मंगलताई धुपे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. शिक्षक व संयोजकांचा सन्मान करण्यात आला. प्रदर्शनीच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला. शिस्तबद्ध नियोजन ठेवून सर्वाधिक विद्यार्थी सहभागी करणाऱ्या संस्थांना पाच हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रदर्शनीदरम्यान डॉ. हर्षाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना सीपीआर प्रशिक्षण देण्यात आले.

## श्री संत गाडगेबाबा यांच्या 150 वी जयंती धुमधडाक्यात विविध कार्यक्रमाने साजरी होणर

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे/तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर तालुक्यातील श्री क्षेत्र सेडगाव श्री राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जन्मभूमी येथे जयंतीनिमित्त धुमधडाक्यात साजरी होणार

कण कण करुनी कोटी केले, कण ही ना खर्चिला स्व हितासाठी, असे निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांची 150वी, जयंती पर्वावर बाबांच्या जन्मभूमी शेंडगावी दि, 23फेब्रुवारी2026रोजी, महाराष्ट्र भुषण, सत्यपाल महाराजांच्या सप्तखंजेरी च्या सप्तसुरात जयंती पर्वावर सुरवात होईल,, त्याच वेळी संत गाडगेबाबा यांच्या संदेशानुरुप आजीवन कार्यरत असलले महाराष्ट्रातील मान्यवराचा,, नवनिर्वाचित नगर सेवकांना बाबांच्या जन्मभूमीत सन्मान करण्यात येईल, सोयरीक,तदनंतर लग्न या जटिल प्रश्नावर एकाच वेळी एकाच ठिकाणी उपवर वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे , या विविध कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्यातील, संत विचारांचे गाढे अभ्यासक, प्रचारक, मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करतील,, अशा विविध कार्यक्रमचा लाभ घ्यावा, असे आवाहन,, डेबुजी युथ ब्रिगेड महाराष्ट्र, तथा संत गाडगेबाबा वशंज जानोरकर परिवार, करीत आहेत,, श्री संतोष रामेकर, भामोद, दर्यापूर तालुका प्रमुख, खास प्रचाराची धुरा सांभाळत सर्व क्षेत्रातील समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी हि विनंती.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेलमध्ये अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा परिषद सदस्या कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, कामगार नेते रवी नाईक, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, अंकुश पाटील, के.सी. पाटील, विश्वजित पाटील, यतीन पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून पंडित



दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करत त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी उपाध्याय यांच्या विचारांचे स्मरण करत त्यांच्या एकात्म मानवतावादाच्या तत्त्वज्ञानाचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनसंघाचे प्रमुख नेते, विचारवंत व तत्त्वज्ञ होते. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक होते आणि पुढे भारतीय जनसंघाच्या स्थापनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी मांडलेले ‘एकात्म मानवतावाद’ हे तत्त्वज्ञान त्यांच्या विचारसरणीचे केंद्रबिंदू मानले जाते. या तत्त्वज्ञानात भारतीय संस्कृतीवर आधारित सर्वांगीण आणि संतुलित विकासाचा विचार मांडण्यात आला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याचा ‘अंत्योदय’ हा त्यांचा मुख्य विचार होता. १९६७ साली ते भारतीय जनसंघाचे अध्यक्ष झाले. ११ फेब्रुवारी १९६८ रोजी त्यांचे निधन झाले.

त्यांचे विचार आणि कार्य आजही भारतीय जनता पक्षाच्या धोरणांमध्ये आणि कार्यपद्धतीत प्रतिबिंबित होताना दिसतात. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे साधेपणा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवेची भावना यांसाठी ओळखले जातात.

## जिल्हास्तरीय गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा शाळेने पटकाविला द्वितीय क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र/राजु शिंदे :** शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये अत्यंत हिरीरी ने भाग घेणारी, व मागील वर्षी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळेमध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक प्राप्त करणारी शाळा म्हणजे दुधा शाळा या शाळेने 'जिल्हास्तरीय गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा 2025-26' या अंतर्गत झालेल्या जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील विद्यार्थ्यांनी पटकाविला दुसरा क्रमांक. यामध्ये सार्थक रामेश्वर खुळे, भाग्यश्री गोकुळ शिंदे व स्नेहल संजय जाधव या इयत्ता 8 वीच्या तिन्ही विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये विचारलेल्या अचूक प्रश्नांची उत्तरे देऊन प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.या सर्व



विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर सहशिक्षक श्री निलेश पिसे सर श्री पंजाब दांदडे सर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य व ग्रामपंचायत कार्यालय तसेच सर्व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अनसिंग फाट्यावरील उघड्यावर अनधिकृत व विनापरवाना मास विक्री बंद करण्यात यावी – सामाजिक कार्यकर्ते अनिल ठाकरे अनसिंग

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** अंनासिंग हे वाशिम जिल्ह्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असलेल्या अनसिंग येथे श्री शृंगऋषी महाराज संस्थान असून ही नगरी धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जाते. श्री शृंगऋषी महाराज, श्री गजानन महाराज मंदिर, साईबाबा मंदिर तसेच दत्त मंदिर अशा अनेक धार्मिक संस्था येथे कार्यरत असून महाशिवरात्री निमित्त दरवर्षी हजारो भाविक संतांच्या दर्शनासाठी अनसिंग येथे येत असतात.अशा पवित्र शृंगऋषी नगरीच्या प्रवेशद्वारावरच व मुख्य रस्त्यालगत अनधिकृत व विनापरवाना उघड्यावर सुरू असलेल्या मास विक्रीकडे संबंधित अधिकारी वर्गाने अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप तक्रारदार सामाजिक कार्यकर्ता अनिल ठाकरे यांनी केला



आहे. भाविक ज्या मार्गाने मंदिर परिसरात प्रवेश करतात, त्याच मार्गावर खुलेआम अनादी कृत व विना परवाना मास कापणी व विक्री सुरू असल्याने धार्मिक भावना दुखावल्या जात असून परिसराच्या पावित्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या संदर्भात तक्रारदार सामाजिक कार्यकर्ता अनिल ठाकरे यांनी ग्रामपंचायत शेलू सापळी उमराळा येथील सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे अनेक वेळा तोंडी व लेखी स्वरुपात तक्रारी केल्या, मात्र अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे संतांच्या नगरीत सुरू असलेली ही अनाधिकृत व कुठलाही परवाना नसताना उघड्यावरील मास विक्री तातडीने बंद करून विक्रेत्यांना अधिकृत जागेत स्थलांतरित करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# आष्टी येथील प्रियदर्शनी इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**परतूर - जालना(अशोक ठोके) :** परतूर तालुक्यातील आष्टी येथील प्रियदर्शनी इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. शाळेच्या प्रांगणात सजविण्यात आलेल्या आकर्षक व्यासपीठामुळे आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसर आनंदमय झाला होता.



या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री वर्षा उसगावकर या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. रामप्रसाद थोरात होते, प्रमुख पाहुणे म्हणून मा. बळीरामजी कडपे (माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, जालना) यांची उपस्थिती लाभली. याशिवाय कृष्णकांत अप्पा पाअष्टेकर (प्रसिद्ध व्यापारी ), शाळेच्या प्रिन्सिपल श्रीमती अर्चना लोढा, संस्था सचिव लताताई थोरात, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणेशजी सुराशे, संस्थेचे सर्व संचालक मंडळ, गावातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी वर्ग, तरुण मित्रमंडळी, विद्यार्थ्यांचे पालक तसेच संस्था संचलित सोमेश्वर माध्यमिक विद्यालय श्रीष्टी शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर देवडे व सर्व कर्मचारी वर्ग, ग्रामदैवत खंडेश्वर अर्बन बँकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रियदर्शनी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात संस्थाध्यक्ष श्री. रामप्रसाद थोरात यांनी प्रियदर्शनी इंग्लिश स्कूलची आतापर्यंतची यशस्वी वाटचाल, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देताना आलेल्या अडचणी व त्यावर मात करत साधलेली प्रगती याविषयी मनोगत व्यक्त केले. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

प्रमुख अतिथी वर्षा उसगावकर यांनी आपल्या भाषणातून बालपणातील शालेय आठवणींना उजाळा दिला. शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमांचे व्यक्तिमत्व विकासात असलेले महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी जपत त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्याचा संदेश त्यांनी पालकांना दिला. तसेच शाळेच्या उपक्रमांचे आणि कार्यपद्धतीचे मनापासून कौतुक केले.

यावेळी शालेय विविध स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान पाहण्यासारखे होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गाण्यांवरील बहारदार नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मनं जिंकली. रंगतदार सादरीकरणामुळे सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अमोल अंभोरे सर व श्री. संतोष झरेकर सर यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, सजावट आणि शिस्तबद्ध आयोजन यामुळे प्रियदर्शनी इंग्लिश स्कूलचा दर्जा पुन्हा एकदा अधोरेखित झाला.

या भव्य सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली असून शिक्षणासोबतच कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही प्रगती करण्याचा आत्मविश्वास त्यांच्या मनात दृढ झाला आहे. आष्टी परिसरात प्रियदर्शनी इंग्लिश स्कूल शिक्षणासोबत संस्कार आणि गुणवत्तेची परंपरा जपणारी संस्था म्हणून अधिक भक्कमपणे उभी राहत असल्याचे या स्नेहसंमेलनाने सिद्ध केले.

---

## संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा 15 फेब्रुवारी 2026 रोजी रंगणार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/गेवराई :** मादळमोही येथील नामांकित / उपक्रमशील असलेली शाळा म्हणजे संत तुकाराम स्कूल या शाळेतील प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा 15 फेबुवारी वार-रविवार रोजी साय.6.00 वाजता आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक वर्षी या शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन हे मोठ्या उत्साहात साजरा केले जाते. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर ,पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित असतात.वार्षिक स्नेह संमेलनामध्ये विद्यार्थी हे वेगवेगळ्या गाण्यावर नृत्य साजरी करतात त्यामध्ये गणपती ,कोळीगीत ,शेतकरी गीत ,पोवाडे भारुड ,नाटक देशभक्तिपर,विविध पारंपारिक नृत्य वेगवेगळ्या गाण्यावर विद्यार्थी आपली कला साजरी करतात.




यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो याच दृष्टिकोनातून शाळेमध्ये प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात येत आहे व त्याची तयारी मोठ्या उत्साहात सुरू आहे असे शाळेचे संचालक गावडे सर यांनी सांगितले या साठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे यांनी आवाहन केले.

---

## क्रांतीवीर उमाजी नाईक यांचे स्वातंत्र्य चळवळीत प्रेरणादायी स्थान : डॉ.शेलार

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा जि. नाशिक व सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात बहि:शाल शिक्षण मंडळ अंतर्गत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. व्ही. डी अहिरे होते.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन केंद्र कार्यवाहक प्रा. केशव गावित यांनी बहि:शाल शिक्षण मंडळाचा उद्देश, हेतू आणि उदय व विकास त्यांची ध्येय, उद्दिष्ट याविषयी माहिती दिली. कार्यक्रमात वक्त्यांचा परिचय डॉ. सी. आर. पाटील यांनी विद्यार्थ्यांना करून दिला.



कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. संजय शेलार यांनी आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांचा जीवनपट व त्यांनी केलेल्या इंग्रजांबरोबर लढाया, संघर्ष जीवनप्रवास, इतिहास, मौखिक तसेच ऑनलाईन प्रोजेक्ट मध्ये पी. पी. स्लाईड्सवर उलगडून सांगितला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्रांतिकारक उमाजी नाईक यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक आद्य क्रांतिकारक होते. त्यांनी स्वातंत्र लाढयसाठी वयाच्या अवघ्या ४३ व्या वर्षी बलीदान दिले, त्यांचा इतिहास वाचून प्रेरणा घेतली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्र कार्यवाहक प्रा. केशव गावित यांनी केले, तर आभार प्रा. सुभाष कामडी यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. सुरेश भोये, प्रा. बाळू धुम, प्रा. कविता भोये, प्रा.कृष्णा गांगोडे, प्रा.देवीदास साळुंके, डॉ. सविता सिरसाठ, प्रा. भगवान महाले यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पोलीस भरती पारदर्शक – दलालांपासून दूर रहा,मेहनतीवर विश्वास ठेवा!

### फसवणुकीपासून सावध रहा : वाशिम पोलीस अधीक्षकांचे उमेदवारांना स्पष्ट आवाहन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम पोलीस भरतीच्या नावाखाली तरुणांची फसवणूक करणारे दलाल आणि एजंट सक्रिय होत असल्याच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी उमेदवारांना ठाम शब्दांत सावध केले आहे. "पोलीस भरती ही पूर्णतः पारदर्शक, नियमबद्ध आणि गुणवत्तेवर आधारित आहे. कुणी 'पैसे दिले की नोकरी लावतो' असे सांगत असेल, तर तो फसवणूक करणारा आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस अधीक्षक पुढे म्हणाले,



"भरती मारणाऱ्या किंवा भरती करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. कोणतेही शॉर्टकट नाहीत. उमेदवारांनी फक्त स्वतःच्या अभ्यासावर, शारीरिक तयारीवर आणि शिस्तीवर विश्वास ठेवावा. पैसे देऊन नोकरी मिळते, असा कोणताही प्रकार पोलीस भरतीमध्ये नाही."

> **वाशिम जिल्ह्यातील पोलीस भरती प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक आहे. कुणीही व्यक्ती 'पैसे दिले की नोकरी लावतो' असे सांगत असेल, तर तो सरळ फसवणूक करणारा आहे. अशा प्रकारची माहिती देणाऱ्या उमेदवारांची ओळख गोपनीय ठेवली जाईल आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता फक्त स्वतःच्या मेहनतीवर, शिस्तीवर आणि जिद्दीवर विश्वास ठेवूनच भरतीची तयारी करावी, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.**
>
> **अनुज तारे, पोलीस अधीक्षक, वाशिम**

कोणत्याही प्रकारची अडचण, शंका किंवा फसवणुकीचा संशय आल्यास उमेदवारांनी थेट वाशिम पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. "गणवेशाचं स्वप्न पाहणाऱ्यांनी ध्येय देशसेवेचं ठेवावं. आजची मेहनत उद्याचा अभिमान ठरेल," असे म्हणत त्यांनी सर्व उमेदवारांना शुभेच्छा दिल्या.

---

## शिवरे केंद्राची एस.एस.सी. परीक्षेसाठी आसन व्यवस्था जाहीर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : फेब्रुवारी/मार्च 2026 मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेसाठी शिवरे परीक्षा केंद्र क्रमांक 1402 येथील आसन व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे. यंदा या केंद्रावर एकूण 293 विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

विद्यालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, मराठी व सेमी माध्यमासाठी क्रमांक D067353 ते D067578 या दरम्यानचे एकूण 228 विद्यार्थी समाविष्ट आहेत. तसेच इंग्रजी माध्यमासाठी D067581 ते D067645 या क्रमांकांदरम्यानचे 65 विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. अशा प्रकारे दोन्ही माध्यम मिळून 293 विद्यार्थ्यांची व्यवस्था शिवरे केंद्रावर करण्यात आली आहे.

परीक्षा सुरळीत, निकोप व कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी सर्वतोपरी तयारी करण्यात आली असल्याचे विद्यालयाचे प्राचार्य पी. एस. सांगळे यांनी सांगितले. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता राखून विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी आवश्यक ती सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.


केंद्राचे पर्यवेक्षक मोहन चकोर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शांतचित्ताने व आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी, असे आवाहन केले. तसेच पालकांनीही विद्यार्थ्यांना सकारात्मक पाठबळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## श्री.छत्रपती हायस्कुल भवानीनगर येथे बोर्ड परीक्षा सुरळीत सुरु

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे मंगळवार दिनांक 10/2/2026 पासून इयत्ता 12 वी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी मार्च 2026 श्री छत्रपती हायस्कुल भवानीनगर केंद्र क्रमांक 0166 वरती सुरळित पणे सुरु झाली.या परीक्षेसाठी भवानीनगर येथील श्री छत्रपती जुनिअर कॉलेज व गोविंदराव पवार जुनिअर कॉलेजचे एकुण 581 विद्यार्थी परीक्षा देत आहेत.यामध्ये विज्ञान,वाणिज्य,कला शाखा रेगुलर व रिपीटर विध्यार्थ्यांची नोंदणी झालेली आहे. शासनाच्या 100 कलमी कार्यक्रमाअंतर्गत 100% कॉपी मुक्त अभियानाची अंमलबजावणी केलेली आहे.श्री आडके साहेब विस्ताराधिकारी शिक्षण विभाग बारामती हे बैठे स्क्वाड म्हणून काम पाहत आहेत ही परीक्षा सुरळीत व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी शासनाच्या सर्व सुचनांचे पालन केल्याची माहिती छत्रपती जुनिअर कॉलेजचे प्राचार्य श्री रमेश मचाले सर यांनी दिली. कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी भवानीनगर पोलीस स्टेशन येथील पुलिस कर्मचारी व कारखान्यांचा सुरक्षा विभाग यांचे सहकार्य लाभत आहे.परीक्षा सुरळीत



पार पाडण्यासाठी दिलीप शिंदे,वैभव काटे,विष्णू पवार यांच्यासह सर्व शिक्षक व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेत आहेत सर्व विद्यार्थ्यांना योग्य सुचना देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले श्री छत्रपती कारखान्याचे संचालक मा.पृथ्वीराज घोलप,मचाले सर,पवार सर,काटे सर, गायकवाड मॅडम,निंबाळकर मॅडम,देवकाते मॅडम,क्षीरसागर मॅडम,कदम मॅडम,कुदळे सर,देवकाते सर,बनसोडे सर, जगताप मॅडम यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी इलेक्ट्रोमीक मिडीया व वृत्तपत्र यांचे प्रतिनिधी उपस्थित होते सर्वांचे केंद्राच्या वतीने हार्दिक स्वागत करण्यात आले.

---

## एस.टी. प्रवासाचा नवा डिजिटल युगारंभ; सवलतधारकांसाठी 'NCMC' स्मार्ट कार्डची अनिवार्यता – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( प्रतिनिधी ):** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या म्हणजेच एसटीच्या प्रवासात आता तंत्रज्ञानाची नवी पहाट उगवली आहे. रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन, पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने एस.टी. महामंडळाने 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) प्रणाली लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.यापुढे विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, ही केवळ तांत्रिक सुधारणा नसून, प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे पाऊल आहे. सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार्डमध्ये सामावल्या जाणार आहेत.

या प्रकल्पासाठी महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि NSDL पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला असून, लवकरच सर्व आगारांमध्ये नोंदणी मोहीम सुरू होणार आहे.

कोणाला मिळणार NCMC कार्ड?

या नव्या योजनेत समाजातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे:

विद्यार्थी: शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या 'सरल' क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल.*

ज्येष्ठ नागरिक व महिला: अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळेल.*

दिव्यांग प्रवासी: UDID क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड.*

पुरस्कारार्थी व पत्रकार: स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालय येथील मुख्यालय आगारा मार्फत वितरण.

कार्डची वैशिष्ट्ये – प्रवासात स्मार्ट सोय

१) किंमत: नवीन कार्ड १९९ रुपये (GST सह). जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास १४९ रुपयांत उपलब्ध.

२) वॉलेट मर्यादा: किमान १०० रुपये; ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज.

३) रिचार्ज सुविधा: ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाईल ॲप किंवा नियुक्त एजंटकडून सहज रिचार्ज.

४)नोंदणीसाठी व्यापक यंत्रणा:

ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी ३००० हून अधिक अधिकृत एजंट नियुक्त करण्यात आले आहेत.

५) बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

एस.टी.चा हा निर्णय म्हणजे परंपरागत प्रवास व्यवस्थेला डिजिटल स्पर्श देणारा टप्पा आहे. तिकीट हातात




आणि सुट्या पैशांची चिंता या जुन्या गोष्टी आता इतिहासजमा होत आहेत. नव्या युगात, एका स्मार्ट कार्डच्या स्पर्शाने प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

# उरण मध्ये जि.प.च्या चार जागां पैकी तीन जागांवर महाविकास आघाडीचा विजय

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** उरण तालुक्यात पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये भाजपा महायुतीचे पानिपत झाले आहे. जिल्हा परिषदेच्या चार जागांपैकी तीन जागा महाविकास आघाडीने जिंकल्या आहेत. तर पंचायत समितीच्या आठ जागांपैकी जागा देखील जिंकून महाविकास आघाडीने वर्चस्व मिळविले आहे.

उरण तालुक्यात जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला मतदारांनी अनुकूल कौल दिल्यामुळे तालुक्यात भाजपा महायुतीची पीछेहाट झाल्याचे दिसून येत आहे. शनिवारी सात फेब्रुवारीला जिल्हा परिषदेच्या चार जागांसाठी 14 उमेदवार तर पंचायत समितीच्या आठ जागांसाठी 23 उमेदवार रिंगणात उतरले होते. सोमवारी (दि.9) फेब्रुवारी रोजी उरण बोकडविरा येथील सिडकोच्या प्रशिक्षण केंद्रात मतमोजणी प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये महाविकास आघाडीने जिल्हा परिषदेवर व पंचायत समितीवर बहुमतकरूनआज पर्यंतच्या विजयाची परंपरा राखली आहे .

यामध्ये जिल्हा परिषद नवघर 26 गटातून, महाविकास आघाडीच्या शिवसेना उबाठा गटाच्या प्रेरणा कुणाल पाटील यांना 10617 मते मिळाली त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपा महायुतीच्या प्रभावती राजाराम भोईर यांना 6198 मते प्राप्त झाल्यामुळे त्यांचा 4 419 मतांनी पराभव झाला. तर नवघर पंचायत गण 51 मध्ये महाविकास आघाडीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे परेश धनाजी ठाकूर यांना 4341 मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपा महायुतीचे हरेश गंगाधर भोईर यांना 3968 मते मिळाल्यामुळे त्यांचा 337 मतांनी पराभव झाला आहे.



भेंडखळ पंचायत 52 गणातून महाविकास आघाडीचे शिवसेना उबठा गटाचे दीपक सुरेश भोईर यांना 4270 मते पडली. तर भारतीय जनता पार्टीचे मिलिंद काशिनाथ पाटील यांना 3136 मते प्राप्त झाली. त्यामुळे त्यांचा 1,134 मतांनी पराभव झाला. तर जासई गट 27 मधून महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार डॉ. मनीष अनंत पाटील यांना 10 8 03 मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपाचे महायुतीचे जे डी जोशी यांना 88 11 मते मिळाल्यामुळे त्यांचा 1992 मतांनी पराभव झाला. जासई पंचायत 53 गणातून महाविकास आघाडीच्या शेकापच्या निर्मला नरेश घरत यांना 4165 मते मिळाल्यामुळे त्या विजयी झाल्या आहेत. तर त्यांचे भाजपा महायुतीचे प्रतिस्पर्धी उमेदवार मनीषा बळीराम घरत यांचा त्यांनी पराभव केला. तसेच चिर्ले पंचायत 54 गणातून महाविकास आघाडीच्या शेकापच्या उमेदवार प्रियांका दीपक मढवी या 6241 मतांनी विजयी झाल्या. त्यांनी भाजपच्या ज्योत्सना अजित पाटील यांचा पराभव केला.

जिल्हा परिषद गट क्रमांक 28 चाणजे मधून भाजपा महायुतीचे उमेदवार रीना जितेंद्र घरत यांना 10069 मते प्राप्त झाली. तर महाविकास आघाडीचे शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार सिद्धी सागर कडू यांना 8437 मते मिळाल्यामुळे त्यांचा 1632 मतांनी निसटता पराभव झाला. पंचायत गण 55 केगाव मधून, महाविकास आघाडीचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार महेश महादेव म्हात्रे यांना 4035 मते प्राप्त झाल्यामुळे ते विजयी झाले आहेत त्यांनी भाजपच्या राजेंद्र आत्माराम ठाकूर यांचा पराभव केला.आहे तर चाणजे पंचायत गण क्रमांक 56 मधून भारतीय जनता पार्टीचे कैलास मोरेश्वर भोईर हे 4751 मतांनी निवडून आले. त्यांनी शेकापच्या अँड सागर सदानंद कडू यांचा पराभव केला.

चिरनेर जिल्हा परिषद गटातून महाविकास आघाडीचे उमेदवार अविनाश ठाकूर हे 14932 मतांनी निवडून आले. तर त्यांचे भाजपचे प्रतिस्पर्धी देवेंद्र विनायक पाटील यांना 11,169 मते मिळाल्यामुळे त्यांचा 3763 मतांनी पराभव झाला असून चिरनेर पंचायत गणातून महाविकास आघाडीच्या उबाठा गटाच्या कविता रुपेश पाटील यांना 8247 मते प्राप्त झाल्यामुळे त्याही विजयी झाल्या. त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपच्या उमेदवार साक्षी सुजित पाटील यांना 5222 मते प्राप्त झाल्यामुळे त्यांचा पराभव झाला. आवरे पंचायत गणातून महाविकास आघाडीच्या शेकापच्या प्रारंभी अविनाश गावंड यांना 7414 मते प्राप्त झाल्यामुळे त्या विजयी झाल्या आहेत. शेकापमधून भाजपमध्ये जाऊन उमेदवारी लढविणाऱ्या उरण पंचायत समितीच्या माजी सभापती समिधा निलेश म्हात्रे यांचा पराभव केला. उरण तालुक्यात महाविकास आघाडीने फिनिक्सपक्षाप्रमाणे जोरदारपणे एन्ट्री घेतल्याने भाजपा महायुतीची दैनी अवस्था करीत महाविकास आघाडीने वर्चस्व मिळविले आहे.

## सोयगाव वनपरिक्षेत्र कार्यालयाचे दिमाखदार उद्घाटन;मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** तालुक्यातील वाडी येथे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे उद्घाटन आज दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी माननीय उपवन संरक्षक श्रीमती सुवर्णा माने (संभाजीनगर विभाग) यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमाला वन विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपवन संरक्षक श्रीमती सुवर्णा माने होत्या. आपल्या मनोगतात त्यांनी वनसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, वनसंपदा ही नैसर्गिक संपत्ती असून तिचे संवर्धन आणि संरक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. नव्याने सुरू झालेल्या या कार्यालयामुळे परिसरातील वनव्यवस्थापन अधिक प्रभावी होईल,



असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी सहाय्यक वन संरक्षक श्रीमती आशा चव्हाण (संभाजीनगर वनपरीक्षेत्र), सहाय्यक वन संरक्षक स्वप्नील भामरे (सिल्लोड),वनपरिक्षेत्र अधिकारी जालना उत्तर फुले मॅडम,वनपरिक्षेत्र अधिकारी सोयगाव अनिल मिसाळ, तसेच वनपाल कोळी साहेब, नागरे साहेब,अली साहेब आणि इतर वन कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमही पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सर्वांनी वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले. परिसर हरित करण्याच्या दृष्टीने भविष्यात अधिकाधिक वृक्षारोपण उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्य रीतीने करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांनी नव्या कार्यालयाच्या माध्यमातून वनसंवर्धनाच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा आशावाद व्यक्त केला.

उपवन संरक्षक श्रीमती सुवर्णा माने यांची प्रतिक्रिया:

“सोयगाव वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या स्थापनेमुळे या परिसरातील वनसंवर्धन व वनरक्षणाच्या कामांना अधिक गती मिळेल. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षलागवड आणि जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.वनसंपदा जपणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.”

## सौ.माधुरी सागर भिसे 14 हजारांहून अधिक मतांच्या टक्केवारीत जिल्ह्यात प्रथम क्रमांकानी विजयी

**दैनिक युवक आधार**
**सणसर /विकास क्षत्रिय** : तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटावर विजय मिळवला असून राष्ट्रवादी काँग्रेसला मागील काळात या गटात कधीच जिंकता आले नाही पण यावेळी निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे.या गटातून राष्ट्रवादीचे उमेदवार सौ.माधुरी सागर भिसे यांनी 17980 मते मिळवत 14772 अधिक मतांच्या फरकाने दणदणीत विजय संपादन केला. त्यांनी भाजपचे उमेदवार सौ धनश्री कांबळे यांचा पराभव केला सौ कांबळे यांना 3208 मते मिळाली.

या गटातील सणसर गणातून



राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार ज्योस्त्ना सुरडकर यांनी 8290 मते मिळवत भारतीय जनता पार्टीच्या सौ.पूनम शेंडगे यांचा पराभव केला.पूनम शेंडगे यांना 1427 मते मिळाली तर लासुर्णे गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या हर्षवर्धन लोंढे हे विजयी झाले असून त्यांना 7990 मते मिळाली त्यांनी भाजपच्या पोपट भिसे यांचा 5490 मतांच्या मोठ्या फरकाने पराभव केला.या तिहेरी विजयामुळे संपूर्ण सणसर लासुर्णे गट राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात आला असून,हा गट सौ माधुरी सागर भिसे यांच्या विजयामुळे राष्ट्रवादी पक्षाचा बालेकिल्ला बनला असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.नवनिर्वाचित सदस्या हे युवा उदयोजक सागर बाळासाहेब भिसे यांच्या पत्नी आहेत.

या विजयाचे मा सागर बाळासाहेब भिसे यांनी स्वागत केले दिवंगत अजितदादांच्या आशीर्वादाने कृषिमंत्री दत्तात्रय भरणे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील पृथ्वीराज जाचक मुरलीधर निंबाळकर सचिन सपकळ तुकाराम काळे सरपंच यशवंत पाटील पार्थ निंबाळकर रणजित निंबाळकर संग्रामसिंह निंबाळकर सागर भोईटे यांचे मार्गदर्शन तसेच सागर भिसे यांच्या युवा मित्र परिवाराचा जनसंपर्क आणि राष्ट्रवादी पक्षाच्या विकासकामांमुळेच हा विजय शक्य झाला आहे,'असे त्यांनी नमूद केले.विजयाप्रीत्यर्थ मा सागर बाळासाहेब भिसे यांच्या वतीने दिवंगत नेते राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या मार्गदर्शनाखाली या गटाने मोठे लीड दिले आहे.या मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केला जाईल असं मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## नवीन पनवेल सेक्टर १३ ए टाईप येथील नवीन पाईपलाईन आणि ड्रेनेज लाइन दुरुस्त करण्याची नगरसेवक मनोज भुजबळ यांची आयुक्तांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर :** नवीन पनवेल सेक्टर १३ ए टाईप येथील जीर्ण झालेली पाणीपुरवठा पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकावी आणि अत्यंत जुनी व जीर्ण अवस्थेत असलेली ड्रेनेज लाइन दुरुस्त करण्याची मागणी नगरसेवक मनोज भुजबळ यांची आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत मनोज भुजबळ यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, नवीन पनवेल सेक्टर १३ ए टाईप परिसरातील अंतर्गत ड्रेनेज सिव्हरेज लाईन ही अत्यंत जुनी व जीर्ण अवस्थेत असून अनेक ठिकाणी तुटलेली व चोकअप झालेली आहे. त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येत असून दुर्गंधी व विविध आजार पसरत आहे. या समस्येमुळे



परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. पावसाळ्याच्या काळात परिस्थिती अधिकच गंभीर होते व नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.तरी सदर सेक्टर १३ ए टाईप येते येथील अंतर्गत ड्रेनेज सिव्हरेज लाईनची तातडीने पाहणी करून, ती योग्य पद्धतीने दुरुस्त करून चांगल्या दर्जाची नवीन लाईन टाकून देण्यात यावी तसेच या परिसरात असलेली पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन ही अत्यंत जीर्ण व जुनी झालेली आहे. सदर पाईपलाईनमधून वारंवार गळती होत त्यामुळे बाहेरील गटाराचे व पावसाचे खराब पाणी त्या पाईप मधून पिण्याच्या पाण्यात मिसळते व त्यामुळे नागरिक वारंवार विविध आजारांनी ग्रस्त होतात पाईप आणि लिकेज मुळे पाण्याच्या दाबामध्ये (प्रेशरमध्ये) मोठ्या प्रमाणात घट झाली आहे, यामुळे परिसरातील नागरिकांना अत्यल्प प्रमाणात पाणी मिळत असून अनेक घरांपर्यंत पाणी वेळेवर व पुरेशा प्रमाणात पोहोचत नाही, याबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नाही. तरी सदर जीर्ण झालेली पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन तातडीने काढून त्या ठिकाणी नवीन व क्षमतेची पाईपलाईन टाकून देण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ह.भ.प. तानाजी बापू महाराज यांचे मधुर वाणीत मुडाणा येथे श्रीमद भागवत कथा सप्ताह

**दैनिक युवक आधार**
**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : महागाव तालुक्यातील मुडाणा येथे विश्वशांती अखंड हरिनाम जप यज्ञ सप्ताह व भागवत कथा ११ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारीपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. गेल्या ४५ वर्षांपासून या पारायणाची परंपरा मुडाणावासीयांनी जपली आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने मुडाणा येथे आरोग्य विषयक तसेच समाजप्रबोधनपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

निजाम आश्रम संस्थेतर्फे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी काकडा, अभिषेक पूजा, ज्ञानेश्वरी पारायण, संगीत भागवत कथा, हरिपाठ व भारुड तसेच रात्री कीर्तन होणार आहे.भागवताचार्य. गुरुवर्य ह.भ.प तानाजी महाराज बोरकर, कीर्तनकार युवा कीर्तनकार ह



भ प प्रणव महाराज हातलेकर , बुधवार हभप अभय महाराज टाले, गुरवारी हभप विनोदाचार्य दिगंबर महाराज नखाते हातगावकर ता पाथरी जि. परभणी, शुक्रवारी

हभप विजय महाराज गवळी, रा.मालेगावकर शनिवारी हभप भागवताचार्य दिगंबर महाराज कुंचलवार शिंगावाडीकर, रविवारला हभप सोपान महाराज सानप, हिंगोली सोमवारी हभप अशोक महाराज तळणीकर, मंगळवारी ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ चालक हभप देवानंद महाराज वानखेडे, हभप नंदकुमार खंदारे, हभप अनिल महाराज

पुरी, हभप साहेबराव महाराज शिंदे, हभप आहे. चोपदार साहेबराव कोंडबा वैद्य, मारुती जाधव चोपदार सांगडे महाराज महागावकर आहेत.

**आरोग्य तपासणी,१५ फेब्रुवारी १०ते१ सामूहिक विवाह**

४५ वर्षांपासून दिवंगत एकनाथ महाराज यांच्या आशीर्वादाने हा सप्ताह घेतला जात आहे. एकनाथ महाराज यांनी ६ जुलै १९९१ रोजी देह त्यागला. त्यानंतर संचालक मंडळ परंपरा पुढे नेत आहे. यादरम्यान मोफत आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे.१५ फेब्रुवारी सकाळी १० ते १ पर्यंत हभप

गुरुवर्य भागवत धर्मप्रचारक

तानाजी बापू बोरकर रा.मुडाणा यांचे काल्याचे कीर्तन होईल. तत्पूर्वी पालखी मिरवणूक आणि सामूहिक विवाह सोहळा होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद व सांगता

होणार आहे. या सप्ताहासाठी निजधाम आश्रम संस्था अध्यक्ष परसराम भगजी वानखेडे, सदानंद पाटील, सर्व संचालक, शिक्षक, गावकरी परिश्रम घेत आहेत.तब्बल ४५ वर्षांपासून मुडाणा येथे हे आयोजन केले जात आहे. दरवर्षी या कार्यक्रमाबाबत पंचक्रोशित भाविकांना उत्सुकता असते.

## पशुवैद्यकीय दवाखान्यात माहितीचा अभाव – जबाबदारी कुणाची?

**दैनिक युवक आधार**
**नांदेड | प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे** : मुदखेड येथील पशुवैद्यकीय दवाखाना (श्रेणी–१) संदर्भात सलग बातम्या, छायाचित्रे व ठोस पुरावे समोर येऊनही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया अथवा स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम व नाराजी वाढत असल्याचे चित्र आहे.

दवाखान्यात एकूण किती पदे मंजूर आहेत, प्रत्यक्ष रोज किती कर्मचारी उपस्थित राहतात, कोण कोण रजेवर



असतात तसेच हजेरी व रजा नोंद (रजिस्टर) नियमित ठेवली जाते की नाही, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

विशेष म्हणजे जनावरांसाठी पाण्याची टाकी उपलब्ध असतानाही पाणी नसणे, परिसरातील अस्वच्छता आणि सेवा ठप्प असतानाही याबाबत जबाबदारी निश्चित न होणे, याकडे नागरिकांनी लक्ष वेधले आहे. यासंदर्भात संबंधितांकडून मौन बाळगले जात असल्याचेही दिसून येते.

“सरकारी कर्मचारी हे जनतेचे सेवक असतात; मात्र येथे जबाबदारीपेक्षा मनमानी कारभार सुरू असल्याचे जाणवते,” अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत. कर्मचारी उपस्थिती, रजा नोंदणी, औषधसाठा व सेवा व्यवस्थेबाबत तात्काळ स्पष्ट व लेखी माहिती जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

तसेच काही बी ए 3 कंठानर वारंवार दवाखान्याबाहेर खाजगी सेवादात्यांकडे दिल्या जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. यामुळे औषधपुरवठा व इतर कामकाजात अनियमितता किंवा गैरप्रकार होत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, याची चौकशी व्हावी अशी अपेक्षा आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा उपयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), नांदेड यांनी दवाखान्याचा तात्काळ दौरा करून वस्तुस्थितीची पाहणी करावी व संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नरनाळा महोत्सव जनजागृती साठी चित्ररथाचा शुभारंभ !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ अकोट तालुका प्रतिनिधी** : सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, इतिहास व संस्कृतीचेदर्शन घडविणारा नरनाळा महोत्सव दि. १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, महोत्सवाबाबत जनजागृतीसाठी चित्ररथाचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.



हा चित्ररथ जिल्ह्यात ठिकठिकाणी पोहोचून महोत्सव उपक्रमाची माहिती पोहोचविण्यात येणार आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, महेश परंडेकर, निखील खेमनार, अधिक्षक श्याम धनमने, ऋषिकेश आग्रे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात नरनाळा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, जंगल सफारी, साहसी खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या समावेशआहे. महोत्सवाच्या प्रत्येक दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. 'चला हवा येऊ द्या', 'शिवशंभू गर्जना', तसेच प्रसिद्ध गायक कैलास खेर यांची 'लाईव्ह कॉन्सर्ट' असे नामवंतकलावंतांचा समावेश असलेले कार्यक्रम महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे.

# लाखनीतील सेतू केंद्र संचालकाला ११ हजारांची लाच घेताना रंगेहाथ अटक!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी भावेश धंदूकिया** : शासकीय कामासाठी दिलेली विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे परत करण्याच्या मोबदल्यात ११ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या सेतू केंद्र संचालकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहाथ अटक केली. ही धडक कारवाई लाखनी येथील सिंधी लाईन चौकातील 'नेहा सेतू केंद्रा'त मंगळवारी करण्यात आली. या कारवाईमुळे परिसरात आणि सेतू केंद्र चालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

सतीश तुळशीराम मोटघरे, असे अटक करण्यात आलेल्या आरोपी केंद्राच्या संचालकाचे नाव आहे.

तक्रारदार हे नोंदणीकृत बांधकाम कामगार आहेत. त्यांनी २०२१ मध्ये



आपल्या मुलांच्या शिष्यवृत्तीसाठी नेहा सेतू केंद्रामार्फत ऑनलाइन अर्ज केला होता. यावेळी संचालक सतीश मोटघरे याने मुलांची १० वीची गुणपत्रिका, डोमिसाईल प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड आणि कामगार कार्ड अशी सर्व मूळ कागदपत्रे स्वतःकडे ठेवून घेतली होती. शिष्यवृत्तीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही तक्रारदाराने वारंवार मागणी करूनही मोटघरे कागदपत्रे परत देत नव्हता.

**अशी केली केली वसुली**

कागदपत्रे परत करण्यासाठी आरोपीने ३० जानेवारी रोजी तक्रारदाराकडे १२ हजार रुपयांची मागणी केली. यात त्याने सहायक कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्याचा वाटा आणि स्वतःचे कमिशन असल्याचे सांगितले. अखेर ११ हजार रुपयांवर तडजोड झाली. लाचेची रक्कम दिल्याशिवाय कागदपत्रे मिळणार नाहीत हे लक्षात आल्यावर तक्रारदाराने भंडारा एसीबीकडे धाव घेतली.

**असा रचला सापळा**

३ फेब्रुवारी रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर आज १० फेब्रुवारी रोजी दुपारी नेहा सेतू केंद्रात एसीबीने सापळा रचला. तक्रारदाराकडून ११ हजार रुपयांची लाच स्वीकारताना पथकाने मोटघरेला रंगेहाथ ताब्यात घेतले. त्याच्याकडून रोख रक्कमेसह वनप्लस कंपनीचा महागडा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. सध्या आरोपीच्या घराची झडती सुरू असून लाखनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूरच्या पोलीस अधीक्षक डॉ. दिगंबर प्रधान, अपर पोलीस अधीक्षक माधुरी बाविस्कर, विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनात उपअधीक्षक डॉ. अरुणकुमार लोहार, पोलीस निरीक्षक नितेश देशमुख, उज्वला मडावी आणि त्यांच्या पथकाने पार पाडली.

# लासलगावमध्ये १५ फेब्रुवारीला तालुकास्तरीय 'संविधान गुणगौरव' पारितोषिक वितरण व संविधान कार्यशाळा

## मा. नूरखान पठाण यांचे विशेष मार्गदर्शन; मा. भास्कर शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**लासलगाव प्रतिनिधी/महेश साळुंके** : शीला मोती बहुउद्देशीय संस्था व सुजाण नागरिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान गुणगौरव परीक्षा २०२५-२६" या तालुकास्तरीय परीक्षेचा भव्य पारितोषिक वितरण सन्मान सोहळा व संविधान कार्यशाळा रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली आहे.

हा कार्यक्रम संकल्प मंगल कार्यालय, कोटमगाव रोड, लासलगाव येथे होणार असून उद्घाटन मा. भास्कर शिंदे (सहाय्यक पोलिस निरीक्षक, लासलगाव पोलीस स्टेशन) यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्रा. नागार्जुन वाडेकर हे राहणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध संविधान अभ्यासक मा. नूरखान पठाण उपस्थितांना संविधानाचे मूल्य, मूलभूत अधिकार व कर्तव्ये तसेच आजच्या सामाजिक परिस्थितीत संविधानाची भूमिका याविषयी सखोल मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मा. संजय कुसाळकर (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, येवला) मा. प्रशांत गायकवाड (पोषण आहार अधीक्षक, पंचायत समिती निफाड), मा. विलास पवार ( कार्याध्यक्ष संविधान गुणगौरव समिती) यांच्यासह लासलगाव विंचूर परिसरातील विविध शैक्षणिक संस्थांचे मान्यवर, शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

तालुक्यातील १३ शाळा मधील विद्यार्थ्यांनी दिलेल्या संविधान गुणगौरव परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. तसेच ज्या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थी या परीक्षेत सहभागी झाले अशा शाळांना ट्रॉफी प्रदान केली जाणार आहे .या कार्यास हातभार लावणाऱ्या संविधान ज्ञानदात्यांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे.संविधान जागृती आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक व लोकशाही मूल्यांची रुजवण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

संविधानाविषयी जाणून घेऊ इच्छिणारे विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक डॉ. चारुदत्त मोतीराम अहिरे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे केले अभिनंदन



**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी रायगड जिल्ह्यातील नेते लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन विजयी उमेदवारांचे अभिनंदन केलेले आहे.

महेश साळुंखे यांनी जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये महायुतीला जाहीर पाठिंबा दर्शविलेला होता . स्वाभिमानी पक्षाच्या सर्व रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केलेला होता. महायुतीच्या रायगड जिल्हा परिषदेच्या व पनवेल महाड माणगाव श्रीवर्धन तालुक्यातील निवडून आलेल्या महायुतीच्या पंचायत समितीच्या उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन केलेले आहे.स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे केले अभिनंदन

# 80 वर्षीय ईसम बेपत्ता



**दैनिक युवक आधार नवीन पनवेल :** 80 वर्षीय गजानन कृष्णा तांबुसकर हे सेक्टर 5 कळंबोली येथून बेपत्ता झाल्याने ते हरवले असल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्यांचा बांधा मजबूत, उंची 168 सेंटीमीटर, रंग सावळा असून केस कमी आणि टक्कल पडलेले आणि दाढी पांढरी आहे. त्यांनी अंगात आकाशी रंगाचा शर्ट, काळी पॅन्ट घातली आहे. त्यांना मराठी आणि हिंदी भाषा बोलता येते. या ज्येष्ठ नागरिकाबाबत काही माहिती असल्यास पोलिस हवालदार एम बी पवार यांच्याशी संपर्क साधावा.

# उमरी तालुकास्तरीय स्पर्धेत मॉडर्न स्कूलचे विद्यार्थिनी कु.आराध्या सुरेश मराठे प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : उमरी तालुकास्तरीय वक्तृत्व आणि गायनाच्या स्पर्धेत मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय उमरीच्या विद्यार्थिनींनी तालूक्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेचे नावलौकिकात भर टाकली आहे. दि ५ फेब्रुवारी २०२६ ते ७ फेब्रुवारी २०२६ मध्ये उमरी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सतीश दर्शनवाड यांचे संकल्पनेतून उमरी येथे तालुकास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १४ वर्षाखालील गटातून मॉडर्न इंग्लिश



स्कूल मधील इयत्ता ८ वीतील विद्यार्थिनी कु.आराध्या सुरेश मराठे हिने वक्तृत्व स्पर्धेत आणि कु.सुखदा शरद जोशी हिने गायन स्पर्धेत उमरी तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

दि. ७फेब्रुवारी २०२६ रोजी तालुकास्तरीय स्पर्धेतील विजेत्यांना कै.गिरीश देशमुख गोरठेकर इंग्लिश स्कूलचे प्रांगणात हा बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला.या वेळी उपस्थित भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस सौ.पुनमताई पवार, स्वच्छता दूत महाराष्ट्र ब्रँड अँबेसेटर ह.भ.प श्री.साईनाथ महाराज बितनाळकर यांचे हस्ते आणि गटशिक्षणाधिकारी सतिश दर्शनवाड, गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.विक्रम देशमुख, केंद्र प्रमुख सतिश पाटील आदी मान्यवरांची यावेळेस प्रमुख उपस्थिती होती.

# कु.सावीच्या पराक्रमाने सिंधुदुर्ग जिल्ह्याचे नाव सातासमुद्रापार,सावी मुद्राळे सिंधुदुर्ग जिल्ह्याचे आरसपानी वैभव जनजागृती सेवा संस्थेकडून सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**कणकवली प्रतिनिधी/गुरुनाथ तिरपणकर :** कला, नृत्य, रिॲलिटी शो, वकृत्व,बाल नाट्य अशा सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात लहान वयातच उंच भरारी घेणारी कासार्डे हायस्कूल,ता.कणकवली.येथे६वी इयत्तेत शिकणारी संरक्षण मंत्रालयाकडून आपल्या दैदिप्यमान कामगिरीवर संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र स्विकारणारी सिंधुदुर्ग कन्या कु.सावी वैभव मुद्राळे हिचा आगळावेगळा सत्कार जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने विशेष सन्मानपत्र प्रदान करुन उत्साहात साजरा करण्यात आला.हा सत्कार समारंभ कु.सावी मुद्राळे यांच्या निवासस्थानी अनेक मान्यवर व मुद्राळे



कुटुंबीयांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे स्वागत मुद्राळे कुटुंबीयांनी हास्यवदनाने, उत्कृष्ट मालवणी मराठमोळ्या पद्धतीने केले. जनजागती संस्था खूप आभारी आहे. याप्रसंगी उद्योजक, खारेपाटण पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रविण शेठ लोकरे, देवांग कोष्टी समाज सहकारी पतपेढी मुंबई चे उपाध्यक्ष, सिंधुदुर्ग जिल्हा कोष्टी समाज सेवा संघ कणकवली चे कार्यकारिणी सदस्य श्री. सत्यवान धुमाळे, वेतोबा सिरियल फेम गाव मामी,गाव गाता गजाली फेम सिने-नाट्य अभिनेत्री सिंधुदुर्ग ग्लोबल फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ.अक्षता ताई कांबळी, अक्षरोत्सव प्रमुख, संदेश पत्र संग्राहक,दै.लोकमतचे पत्रकार श्री. निकेत पावसकर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रख्यात चित्रकार, निसर्ग प्रेमी,प्राणी मित्र, समाजसेवक श्री.अक्षय मेस्त्री, खारेपाटण पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री.भाऊ राणे, खारेपाटण पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक श्री.विजय देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.या सर्वांच्या उपस्थितीत जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने कु.सावी वैभव मुद्राळे हिला शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, संस्था कार्यअहवाल भगवद्गीता व विशेष आकर्षक सन्मानपत्राने सन्मानित करण्यात आले.सन्मानपत्राचे वाचन संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी केले.सर्वच प्रमुख अतिथी व मान्यवरांनी कु.सावीच्या या उज्वल यशाबद्दल भरभरून कौतुक व अभिनंदन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. अनिल कांबळी,सौ.अक्षता कांबळी,सौ. गंधाली तिरपणकर यांचे सहकार्य लाभले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे खजिनदार श्री.दत्ता कडुलकर यांनी विशेष मेहनत घेतली.

# सापळी फाट्यावर शेगाव-उमरखेड एसटी बसचा अपघात; ३७ प्रवासी बालाबाल बचावले

**दैनिक युवक आधार**

**गजानन पवार पाटील :** उमरखेड आगाराच्या शेगाव-उमरखेड बसला आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास सापळी फाट्याजवळ भीषण अपघाताचा सामना करावा लागला. सुदैवाने या अपघातात बसमधील ३७ प्रवासी पूर्णपणे सुखरूप असून मोठी जीवितहानी टळली आहे. मात्र, या घटनेत चालक आणि वाहक जखमी झाले असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, उमरखेड आगाराची MH 14 BT 4362 क्रमांकाची बस वाशिम वरून उमरखेड कडे येत होती. दुपारी ३ वाजता ही बस सापळी फाट्यावर आली असता हा अपघात घडला. या मध्ये मोटार सायकल ही सापळी वरून भरदाव वेगाने येत होती त्या मोटर सायकलला वाचत असताना व रस्त्याच्या कडेला एक टू व्हीलर व फोर व्हीलर उभी होती अपघातानंतर प्रवाशांमध्ये मोठी घबराट पसरली होती.

वाहतूक नियंत्रकांकडून तातडीची मदत

घटनेची माहिती मिळताच अनसिंग आगाराचे वाहतूक नियंत्रक पांडुरंग यादव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी प्रसंगावधान राखून जखमी चालक संजय शिवदास धाये (बिल्ला क्र. ३४७६१) आणि वाहक धनेश्वर भाऊराव थाटबड्वे (बिल्ला क्र. १६०२) यांना तातडीने औषधोपचारासाठी दवाखान्यात हलवले.

प्रवासी सुखरूप

वाहतूक नियंत्रक यादव यांनी प्रवाशांची विचारपूस केली असता, सर्व ३७ प्रवासी सुखरूप असल्याचे समोर आले. घटनास्थळावर प्रवाशांना किरकोळ दुखापत वगळता कोणालाही गंभीर इजा झाली नाही. अपघाताची माहिती मिळताच पोलीस प्रशासन सुद्धा हजर झाले परिसरातील नागरिकांनीही मदतीसाठी धाव घेतली होती.



घटनेचा तपशील:

बस क्रमांक: MH 14 BT 4362 (आगार - उमरखेड)

वेळ व ठिकाण: दुपारी ३:०० वाजता, सापळी फाटा.

चालक: संजय शिवदास धाये (बिल्ला क्र. ३४७६१)

वाहक: धनेश्वर भाऊराव थाटबड्वे (बिल्ला क्र. १६०२)

प्रवासी संख्या: ३७ (सर्व सुरक्षित)

या अपघातामुळे मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती, मात्र एसटी प्रशासनाने तत्परतेने मदतकार्य राबवून परिस्थिती नियंत्रणात आणली.

# नेपाळच्या पत्रकारांची 'सुखकर्ता'वर सदिच्छा भेट!; नेपाळचे क्रीडा पत्रकार पडले महेंद्रशेठ घरत यांच्या प्रेमात!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** नेपाळचे पत्रकार आयसीसी टी २० वर्ल्ड कप क्रिकेट सामन्यांचे वार्तांकन करण्यासाठी भारतात आले आहेत. त्यांना आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांची ख्याती माहिती आहे. त्यांनी दोन वेळा कैलास मानसरोवर यात्रा केल्याने, तसेच नेपाळमधील एका शाळेला साह्य केल्याने महेंद्रशेठ घरत यांची महती नेपाळमध्येही आहे. त्यामुळे २० पत्रकार बांधवांनी भारतात आल्यावर महेंद्रशेठ घरत यांची मंगळवारी (ता. १०) 'सुखकर्ता'वर सदिच्छा भेट घेतली. यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी नेपाळच्या क्रीडा



पत्रकारांशी संवाद साधला, त्यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी ते म्हणाले, "मी पत्रकारांवर विशेष प्रेम करतो, आपण भारतात क्रिकेट सामन्यांच्या वार्तांकनासाठी आल्याने मलाही आनंद झाला आहे. कारण मीही क्रिकेटचा प्रचंड चाहता आहे. भारत-पाकिस्तान सामना जगाच्या पाठीवर कुठेही असला तरी मी आवर्जून प्रत्यक्ष 'याचि देही याचि डोळा' पाहायला जातो. मी आजही मनमुराद क्रिकेट खेळतो. आपण नेपाळहून आमच्याकडे आल्याने 'अतिथी देवो भवं' या नात्याने आपला आदर-सन्मान करणे माझे कर्तव्य आहे. त्यामुळे 'सुखकर्ता'वर आपले मनापासून स्वागत करतो. आपण ज्या ज्या वेळी भारतात याल, तेव्हा आम्ही आपल्या सेवेशी सदैव असू."

यावेळी महेंद्रशेठ घरत यांना प्रत्यक्ष पाहून आणि त्यांच्या कामाचा आवाका पाहून नेपाळचे पत्रकारही त्यांच्या प्रेमात पडले. यावेळी महेंद्रशेठ घरत यांच्याशी पत्रकारांनी दिलखुलास संवाद साधला, मनमोकळ्या गप्पा मारल्या. आपण 'माणूस' म्हणून ग्रेट आहात. आम्ही सातासमुद्रापार राहतो, पण भारतात आल्यावर आम्हाला आपण कुटुंबासारखे प्रेम दिलेत, हे प्रेम आम्ही कधीही विसरणार नाही. आपण ज्यावेळी यापुढे कधीही नेपाळमध्ये याल तेव्हा आम्ही तुमच्यासोबत असू, तुम्हालाही आम्ही सर्व सहकार्य करू," अशा भावना नेपाळच्या पत्रकारांनी शेलघर येथील 'सुखकर्ता' बंगल्यावर व्यक्त केल्या.

# राज्यात 15 लाख विद्यार्थी बारावीची परीक्षा देणार

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च 2026 मध्ये घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र बारावीची परीक्षा मंगळवार 10 फेब्रुवारी ते बुधवार 18 मार्च 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी एकूण 15 लाख 32 बत्तीस हजार 487 विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. त्यामध्ये 8 लाख 20 हजार 229 मुले,7 लाख 12 हजार 240 मुली व 18 ट्रान्सजेंडर आहेत. एकूण 10 हजार 664 कनिष्ठ महाविद्यालयांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून, या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी 3हजार 387 मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे

प्रचलित पध्दतीप्रमाणे 'माहिती तंत्रज्ञान' व 'सामान्य ज्ञान' या दोन विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतली जाणार असून माहिती तंत्रज्ञान या विषयासाठी एकूण 2 लाख 36 हजार 320 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे व सामान्य ज्ञान या विषयासाठी एकूण 1 हजार708 विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी 3 फेब्रुवारी 2026 पर्यंत आवेदनपत्रे स्विकारण्यात आलेली आहेत. परीक्षांच्या कालावधीत अनेक विद्यार्थी नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भितीने मानसिक दडपणाखाली असतात अशा विद्यार्थ्यांना नैराश्येतून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी राज्य मंडळ स्तरावरुन समुपदेशन करण्यासाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



करण्यासाठी व त्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी विभागीय मंडळ स्तरावर जिल्हानिहाय प्रत्येकी दोन याप्रमाणे समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

राज्य मंडळ व 9 विभागीय मंडळात नियंत्रण कक्ष कार्यरत करुन हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. सर्व परीक्षार्थ्यांना परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोहोचणे आवश्यक आहे. सर्व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगइन मध्ये ऑनलाईन प्रवेशपत्र (हॉल तिकीट) उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. गतवर्षी प्रमाणेच फेब्रुवारी-मार्च 2026 परीक्षेसाठी परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वेळ वाढवून देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी राज्य परिवहन महामंडळामार्फत गाडया नियमित व वेळेत सोडणेबाबत येणार असून परीक्षा केंद्रावर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने अखंडीत विद्युत पुरवठा करावयाचा आहे. मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन व तत्सम परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर 12 मार्च ते 14 मार्च 2026 रोजी आऊट ऑफ टर्न ने आयोजित करण्यात आलेली आहे.

परीक्षा काळातील संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा यादृष्टीने मंडळामार्फत राज्यात 271 भरारी पथके नेमण्यात आली आहे. मंडळ सदस्य आणि जिल्हास्तरीय शासकीय अधिकारी यांना परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेटी देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. राज्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्याकरीता ज्या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही उपलब्ध आहेत तेथे परीक्षा कॅमेराबध्द घेण्यात येतील. ज्या परीक्षा केंद्रांवर परीक्षेशी निगडीत स्टाफ कडून गैरप्रकार झाला असेल अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दक्षता समितीच्या कार्यनिश्चीतीनुसार संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करण्यात आली आहे.

## उद्योजकांची निर्यात मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग** : जिल्ह्यातील उद्योजकांना जागतिक बाजारपेठेची ओळख करून देण्यासाठी आणि निर्यातीला चालना देण्यासाठी उद्योजकांच्या कार्यशाळेचे आयोजन नियोजन भवन येथे करण्यात आले होते. अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण मेहरे यांच्या हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. या कार्यशाळेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी उद्योजक, निर्यातदार आणि संस्थांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्राच्या उद्योग धोरणातील सवलती, अनुदान आणि सरकारी योजनांची माहिती नागपूर विभागाचे उद्योग सहसंचालक शिवकुमार मुद्यमवार यांनी उद्योजकांना दिली. ग्लोबल नेटवर्किंगमुळे स्थानिक उत्पादकांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्यासाठी या कार्यशाळेने एक भक्कम व्यासपीठ उपलब्ध करून दिले असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर जिल्ह्यातील निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन देऊन निर्यातीला चालना व जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला नवी दिशा देण्यावर त्यांनी भर दिला.

सहाय्यक संचालक स्नेहल ढोके यांनी शुल्क सवलतीचा प्रभावी वापर आणि ट्रेड फॅसिलिटेशन पोर्टलच्या महत्त्वावर सादरीकरण केले. न्यू इंडिया इन्शुरन्सचे अभिनय वानखेडे यांनी उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या 'जनरल इन्शुरन्स' बाबत तांत्रिक मार्गदर्शन केले. एमएसएमईचे अक्षय शाह यांनी 'एक जिल्हा एक उत्पादन' योजनेअंतर्गत निर्यातीच्या जागतिक संधीवर प्रकाश टाकला.

कार्यशाळेत कौशल्य विकास, रोजगार व नाविन्यता विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुनंदा बजाज यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी उद्योजकांना लागणारे कुशल मनुष्यबळ, शासनाच्या विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजना आणि त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधीविषयी सादरीकरण केले. प्रशासकीय सुविधा (MAITRI): कामगार विभागाचे नोडल ऑफिसर विजय शिंदे यांनी 'बिझनेस फॅसिलिटेशन सेंटर्स द्वारे मिळणाऱ्या सेवांचे सादरीकरण केले. तसेच आयडीबीआय बँकेच्या प्रतिनिधींनी आर्थिक मदतीबाबत माहिती दिली.

'महास्ट्राईड' हा जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येणारा 2 हजार 232 कोटी रुपयांचा प्रकल्प असून, याचा मुख्य उद्देश राज्यातील जिल्ह्यांची संस्थात्मक क्षमता वाढविणे आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासाला चालना देणे हा आहे. स्थानिक उत्पादकांना आणि उद्योजकांना जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कसे योगदान देता येईल आणि शासकीय यंत्रणेची मदत कशी घ्यावी, याचे तांत्रिक मार्गदर्शन राजन पंधारे यांनी केले केले. विक्रम शेट्टी यांनी उद्योगांना आवश्यक असलेल्या आधुनिक कौशल्य प्रशिक्षणाबाबत माहिती दिली. या मार्गदर्शनामुळे नवीन उद्योजकांना आणि एमएसएमई घटकांना आपल्या उद्योगासाठी कुशल कामगार आणि तरुणांना रोजगाराभिमुख कसे करता येईल, याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

इंडिया पोस्टचे मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह धनंजय राऊत यांनी 'निर्यातबंधू उपक्रमांतर्गत टपाल विभागाच्या सेवांची माहिती दिली.सामुहीक प्रोत्साहन योजनाः जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक एन.बी. गायकवाड यांनी राज्याच्या निर्यात धोरणाबाबत विवेचन केले.

या कार्यशाळेत जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक, निर्यातदार, शेतकरी सहकारी संस्था आणि विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक डी.एम. चोरघडे यांनी केले.

## रायगडमध्ये 14 फेब्रुवारीला शासकीय योजनांचा महामेळावा ; एकाच छताखाली सर्व सेवा उपल

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नितीन लोखंडे /तळा :** सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत 14 फेब्रुवारी 2026 रोजी अलिबाग येथील कुरूळ येथील आरसीएफ हॉल येथे भव्य 'विधी सेवा शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा' आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या महामेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आणि त्यांना योजनांचा थेट लाभ मिळवून देणे हे आहे. जिल्हा प्रशासन, जिल्हा न्यायालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडणार असून, कार्यक्रमात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत, जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच जिल्हा परिषदेच्या




मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलिस अधीक्षक आँचल दलाल आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

महामेळाव्यात विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. आरोग्य, शिक्षण, कृषी, समाजकल्याण, महिला व बालविकास, मत्स्यव्यवसाय, आदिवासी विकास, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), तसेच एसटी महामंडळ आदी विभागांमार्फत योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, केवळ माहितीपुरते न राहता पात्र लाभार्थ्यांचे अर्ज जागीच भरून घेण्याची आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला देण्यात येणार असून, विविध कायदेशीर हक्क, सरकारी योजना, तसेच न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय, निवडक लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात योजनांच्या लाभांचे वाटपही करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात निवडणूक विभागाचाही स्टॉल असणार असून, नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीत दुरुस्ती तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत जनजागृती केली जाणार आहे. त्यामुळे युवक व नवमतदारांसाठी ही संधी उपयुक्त ठरणार आहे.

पत्रकार परिषदेत अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील यांचीही प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा प्रशासनातील सर्व विभागांनी एकत्र येऊन नागरिकांच्या दारी शासनाच्या योजना पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू जनतेला, या महामेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांचा तसेच मोफत विधी सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## पंडित दीनदयाल उपाध्याय यांना नागपूर भाजपच्या वतीने अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर** : भारतीय राजकारणातील ध्रुवतारा आणि भारतीय जनसंघाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा स्मृतिदिन आज नागपूर भाजप कार्यालयात आदराने साजरा करण्यात आला. समाजात नैतिक मूल्यांची रुजवणूक करणारे आणि अंत्योदयाचा विचार मांडणारे महान लोकनेते म्हणून पंडितजींची ओळख आहे.या स्मृतिदिनाचे औचित्य साधून नागपूर येथील भाजप कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडितजींच्या प्रतिमेला



पुष्पार्पण करून आदरांजली वाहण्यात आली.यावेळी उपस्थितांना संबोधित करताना भाजप नागपूर चे अध्यक्ष दयाशंकर तिवारी म्हणाले की, "पंडित दीनदयाल उपाध्याय हे एक दूरदर्शी विचारक आणि महान राष्ट्र-निर्माता होते, ज्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजाच्या सेवेसाठी समर्पित केले. त्यांनी मांडलेला 'एकात्म मानववाद' हा सिद्धांत आजही जगासाठी मार्गदर्शक असून, वंचितांची सेवा करण्याचा त्यांचा संदेश 'विकसित भारता'च्या प्रवासाला निरंतर प्रेरणा देतो." त्यांनी पुढे नमूद केले की, पंडितजींचे साधे जीवन आणि उच्च विचार आजही सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ आहेत.या प्रसंगी नागपूरच्या महापौर नीताताई ठाकरे, उपमहापौर लीलाताई हातीबेड आणि सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच भाजपचे महामंत्री व नगरसेवक श्रीकांत आगलावे, महामंत्री संदीप जाधव, महामंत्री मनीषाताई धावडे ,संजय बंगाले,नेताजी गजभिये,जितू ठाकूर,कार्यालय मंत्री ब्रिजभूषण शुक्ला, अशोक नायक,पवन तिवारी मनोज सिह,आशिष पाली यांसह पक्षाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंडितजींच्या विचारांचे स्मरण करत, समाजात शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचवण्याचा संकल्प यावेळी सर्व उपस्थितांनी केला.

## देवगाव येथे १८ वर्षीय युवकाची आत्महत्या; गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : देवगाव (ता. निफाड) येथे एका १८ वर्षीय युवकाने राहत्या घरात छतावरील पंख्याला साडीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना घडली असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिस पाटील सुनिल बोचरे यांनी समक्ष खबर दिली की, यातील यातील इसम राकेश गोरख पवार वय १८ वर्ष रा.इंदिरानगर देवगाव



याने दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३०वाजेच्या सुमारास राहते घरात छतावरील फॅनला साडीचे साहाय्याने गळफास घेतला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक मोहन पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन त्यास ग्रामीण रुग्णालय लासलगाव येथे उपचाराकामी दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास तपासुन मयत घोषित केले. सदर घटनेची लासलगाव पोलिस ठाण्यात अ.मृ रजि नंबर ११/२०२६ भा.न्या.संहिता कायदा २०२३ चे कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा. औदुंबर मुरडनर अधिक तपास करीत आहेत.

## विजयाची सुवर्णगाथा;जि. प. कें. प्रा. शा. भारज बु. जिल्ह्यात प्रथम!

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी/ ज्ञानेश्वर निकाळजे** : हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर जिल्हास्तरीय वाद-विवाद स्पर्धेत इयत्ता ६ वी ते ८ वी गट, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा भारज बु. ता. जाफराबाद, जि. जालना येथील विद्यार्थिनींनी आपल्या अमोघ वक्तृत्वाच्या जोरावर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

**यशस्वी रत्न:**

*कु.सोनल विष्णू नाईक*

*कु.आरती रामेश्वर पायघन*

या यशाचे खरे शिल्पकार जि. प. कें. प्रा. शा. भारज बु. येथील सर्व शिक्षक वृंद आहेत. सर्व शिक्षकांच्या सामूहिक परिश्रमातून, मार्गदर्शनातून आणि दिलेल्या




प्रोत्साहनामुळेच आज आपल्या शाळेचा डंका जिल्हास्तरावर वाजत आहे.

तालुक्याचा आणि शाळेचा गौरव वाढवणाऱ्या या रणरागिणींचे आणि त्यांना घडवणाऱ्या सर्व गुरुजनांचे जिल्हाभर कौतुक होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल भारत बुद्रुक नगरीचे प्रथम नागरिक सो शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रे. माजी सरपंच तुळशीराम पायघन शालेय समिती अध्यक्ष शरद तेलंग्रे उपाध्यक्ष प्रदीप नरवाडे सर्व सदस्य तसेच माजी अध्यक्ष रामभाऊ सुरडकर गणेश काटकर विलास क्षीरसागर राजेश दामदर नानाभाऊ बोडके पोलीस पाटील संजय तेलंग्रे पत्रकार शंकर डब्बे यांच्यासह अनेक नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून खूप खूप शुभेच्छा दिल्या

## माई बेकर्स सुगी महोत्सव मुलुंड येथे उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत/मुंबई :** पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ संस्थेच्या वतीने मुलुंड पश्चिम येथे आयोजित केलेला माई बेकर्स सुगी महोत्सव नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ संस्थेचे पुणे चे जनसंपर्क अधिकारी व ठाणे शाखेच्या सल्लागार तसेच जनसंपर्क प्रमुख साधना निंबाळकर यांच्या प्रयत्नानी फेब्रुवारी ६,७ व ८ रोजी हा महोत्सव आयोजित केला होता. या तीन दिवसांत शेकडो लोकांनी भेट देऊन वस्तू खरेदी केल्या.अनाथांची माई पद्मश्री डॉ.सिंधुताई सपकाळ यांनी सन १९९४ साली ममता बाल सदन (बालगृह) कुंभारवळण ता. पुरंदर जिल्हा पुणे ही संस्था स्थापन केली असून ही संस्था अनाथ, निराधार, निराश्रित, गोरगरीब-गरजू मुलींच्या संगोपणासाठी काम करीत आहे. पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण येथे सेक्शन 8 अंतर्गत नोंदणीकृत "डॉ. सिंधुताई सपकाळ फाउंडेशन" (CIN No. U88100P-N2023NPL219178) कार्यरत आहे. या फाउंडेशनला 80G, 12A तसेच FSSAI No. 21524084003204 असा सर्व आवश्यक परवाने प्राप्त झालेले आहेत. माईंच्या स्वप्नाप्रमाणे त्यांच्या सर्व संस्था स्वावलंबी, आत्मनिर्भर व सक्षम व्हाव्यात, मुला-मुलींना रोजगाराच्या संधी मिळाव्यात आणि भविष्यात कोणालाही कुणाकडे हात पसरावा लागू नये, या उद्देशाने "माई बेकर्स" हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे गव्हाचे पीठ (कणिक), गीर गाईचं दूध, खवा, साजूक तूप, काजू, साखर यापासून बनवलेला गोरसपाक हा आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक पुणेकरांच्या मनाचा लाडका ठरला आहे. याशिवाय गीर गाईचे शुद्ध तूप, नमकीन, टुटी फ्रुटी, नानकेट इत्यादी दर्जेदार गुणवत्तेची बिस्किटे बनविली जात आहेत. या छोट्या पावलातून मोठं स्वप्न पूर्ण करण्याची आमची धडपड सुरु आहे. या प्रकल्पातून मिळणारा प्रत्येक रुपया माईंच्या




अनाथ, निराधार लेकरांच्या अन्नासाठी, शिक्षणासाठी, संगोपनासाठी वापरला जातो. याशिवाय महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) जिल्हा पुणे अंतर्गत सिंधुमाई स्वयंम सहाय्यता महिला बचत गट समूहाची स्थापना केली असून त्याचा एनआयसी कोड 908206 असा आहे. कदाचित अनाथ मुलींचा पहिलाच महिला बचत असावा. बचत गट प्रदर्शनी, कृषी प्रदर्शनच्या माध्यमातून जिथे संधी मिळेल तिथे स्टॉल लावून या पदार्थांची विक्री केली जाते. यातून मिळालेल्या पैशातून मुलींच्या शिक्षणासाठी, संगोपनाच्या खूप मोठा हातभार लागला जातो. संस्थेच्या अनेक गरजा भागविण्यास या पैशांची मदत होते. माई जरी सोबत नसल्या तरी त्यांची माया, त्यांचं कार्य, त्यांचा वसा आजही जिवंत आहे. "माई परिवार" आज त्या पवित्र कार्याला पुढे नेत आहे. रोजच्या जीवनात प्रत्येक लेकरासाठी अन्न, शिक्षण, संगोपन, औषधं, कपडे यांची आवश्यकता उभी ठाकते. प्रत्येक दिवस नवा संघर्ष घेऊन उभा असतो. तरी माईंचे कार्य मात्र त्या नसल्या तरी अविरतपणे चालू आहे.माई नेहमी म्हणायच्या, मी अनाथांचे माय झाले तुम्ही गणगोत व्हा", मी नाहीये तर काय झालं, माझी लेकरं आहेत. माझ्या लेकरांची जबाबदारी ही समाजाची आहे." या लेकरांसाठी आज आपणही गणगोत होऊन गोरसपाक कुकीज खरेदी करून सहकार्य करावे, अशी भावनिक हाक,माफक अपेक्षा या महोत्सवाचे निमंत्रक मुकेश चौधरी व साधना निंबाळकर यांनी व्यक्त केली. मुंबई स्वयंपाकगृह आणि महाराष्ट्र सेवा संघाच्या भक्ती चपळगावकर यांनी ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल निमंत्रकानी त्यांचे विशेष आभार मानले.

# मौजे शिंदी ता.जाफराबाद जिल्हा जालना येथील नागरिक अवैध दारू विक्रत्यामुळे त्रस्त



**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद प्रतिनिधी/ दिनकर जंजाळ** : मौजे शिंदी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील नागरिक अवैध दारू विक्रेत्यामुळे त्रस्त झाले आहे गेली कित्येक दिवसांपासून गावकरी अवैध दारू विक्रेत्याला समजावून संगीले परंतु हे काही ऐकत नाही गावकऱ्यांनी गेली कित्येक पोलिसात तक्रारी सुध्दा केल्या परंतु याच्यावर कुठलीच कारवाई झाली नाही.दारू पासून शिंदी गावात खूप नुसकान झाले गेली कित्येक माणसं मृत्यू पावले तरी अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई का होत नाही असा जाब विभागीय पोलिस अधिकारी भोकरदन यांना शिंदी ह्या गावचे प्रथम नागरिक सन्माननीय गणेश दामोधर उपसरपंच संतोष पांडुरंग जंजाळ सदस्य गुलाबराव वाघ सदस्य संजय पाटिबा जंजाळ शफीक सय्यद.आयास खा.पठाण.शेनफड सोनुने.योगेश जंजाळ.गणेश नारायण जंजाळ. भगवान जंजाळ.कौतिकराव गावंडे.परेश मोरे. या सर्वांनी प्रतेक्ष भेट घेऊन विचारले असता अधिकाऱ्यांनी कठोर अशी कारवाई करू असे आश्वासन दिले.

# बाबासाहेबांइतकेच समाजावर माता रमाईंचे उपकार” – भाई सिद्धांत वानखेडे

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती सायळा गावात बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या गीतांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक शाहीर विलास गवार गुर व त्यांच्या संगीतमय संचाने भीम गीतांनी संपूर्ण रात्र रंगवली.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या तसेच माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार समारंभ पार पडला. प्रास्ताविक मा. प्राचार्य विकास सरकटे सर यांनी केले.



या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक राजू गवई सर व समाधान खरात सर होते. उद्घाटन मा. प्राचार्य विकास सरकटे सर यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष म्हणून रामदास आव्हाळे (मा. सरपंच) होते. प्रमुख उपस्थितीत भाई सिद्धांत वानखेडे, प्रकाश भाऊ सरकटे यांचा समावेश होता.

राजू गवई सर व समाधान खरात सर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय जीवनावर आणि भारतीय संविधानाच्या मूल्यांवर सखोल विचार मांडले.

**“डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मागे उभी राहिलेली माता रमाई आंबेडकर ही त्यागाची खरी मूर्ती आहे. त्यांच्या कष्टांमुळेच बाबासाहेब समाजासाठी लढू शकले. रमाईंचा हा त्याग विसरणे म्हणजे आपल्या इतिहासालाच विसरणे होय.”**

**— भाई सिद्धांत वानखेडे**
**जिल्हाध्यक्ष, आझाद समाज पार्टी (भीम आर्मी प्रणित)**

या कार्यक्रमाचे आयोजन माणिकराव सरकटे, भाई शरद सरकटे, डॉ. सुखदेव गवई, रेखाबाई सरकटे, कल्पनाताई सरकटे आदींनी केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन संतोष भाऊ सरकटे यांनी केले तर आभार प्रदर्शन भाई शरद सरकटे व माणिकराव सरकटे यांनी केले. एकंदरीत हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात, मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष घाटकोपर (प.)तर्फे वार्ड क्र.१२४ च्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सकिना ताई शेख यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर)** : शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष घाटकोपर पश्चिम विधानसभांच्यावतीने शिवसेना नेते खासदार ग्राहक संरक्षण कक्षाचे अध्यक्ष मा.श्री.अनिल भाऊ देसाई यांच्या आदेशानुसार तसेच ग्रा.सं.क.सचिव मा.श्री.निखिलजी सावंत व श्री. अशोक शेंडे यांच्या सूचनेनुसार महानगरपालिका एन विभागांमधील झालेल्या २०२६ मुंबई महानगर पालिका मधील निवडणुकीमध्ये निवडन आलेले घाटकोपर पश्चिम मधील शाखा क्रमांक १२४ नगरसेविका सौ.सकिना ताई शेख व श्री.इब्रानभाई शेख युवासेना समन्वय याचाही सत्कार शाल व पुष्पगुच्छ देऊन ग्रा.स.क. पदाधिकारी यांच्यावतिने करण्यात आले.यावेळी महीला शाखा संघटीका सौ.संगीता ताई तुळसकर , युवा सेना विभागाधिकारी कु.श्रुती खोपकर,कक्ष विधानसभा संघटक श्री.यशवंत विठ्ठल खोपकर,कक्ष प्रसारक श्री. अनंत पवार ,कक्ष उपसंघटक शाखा क्र १२३/१२४ श्री राजेंद्र पेडणेकर ,कक्ष वार्ड संघटक श्री. संतोष चांदे १२३,कक्ष वार्ड संघटक शाखा क्र.१२४ निर्मला आवटे ताई,कक्ष वार्ड संघटक तानाजी सावंत १२६, कक्षप्रतिनिधी श्री प्रकाश कुष्टे,श्री रियाज शेख,श्री. प्रमोद जाधव,श्री.सचिन भालेकर, इत्यादी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.





# कारागृहातील आरोपीचा उपचारादरम्यान मृत्यू; नातेवाईकांचा शोध

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी /दीपक कांबळे** : तळोजा पोलीस ठाणे हद्दीत गुन्ह्यात अटक करण्यात आलेला आणि तळोजा केंद्रीय कारागृहात शिक्षा भोगत असलेला विजयकुमार मुजेश्वर मंडल (वय ५५ वर्षे) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे कारागृह प्रशासन आणि पोलिस यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजयकुमार मंडल हा मूळचा नेपाळ येथील रहिवासी असून सध्या तो नांगरी, ता. पनवेल, जि. रायगड येथे वास्तव्यास होता. त्याच्याविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्याला तळोजा कारागृहात ठेवण्यात आले होते.

दरम्यान, कारागृहात असताना त्याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्याला तातडीने उपचारासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

प्राथमिक वैद्यकीय अहवालात मृत्यूचे कारण ‘Pulmonary Consolidation’ असल्याचे नमूद करण्यात आले असून अंतिम वैद्यकीय अहवाल अद्याप प्रलंबित आहे. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून पुढील प्रक्रिया सुरू आहे.दरम्यान, मृत विजयकुमार मंडल याच्या नातेवाईकांचा शोध सुरू असून संबंधितांनी तात्काळ खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सेलू ते मानवत रोडचे काम संथगतीने; नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये संताप

**दैनिक युवक आधार**

**सेलू /प्रतिनिधी** : सेलू ते मानवत या महत्त्वाच्या मार्गावरील रस्त्याचे काम सध्या अत्यंत संथगतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून रस्ता बांधकामासाठीची यंत्रसामग्री परभणी रोड परिसरात एकाच ठिकाणी उभी असून प्रत्यक्ष कामाला अपेक्षित वेग नसल्याचे दिसून येत आहे.

या संथगतीमुळे स्थानिक नागरिक तसेच व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. शहरातून



रस्त्याचे काम एका बाजूने सुरू करण्यात आले असले, तरी दुसऱ्या बाजूचे काम सुरू होताना दिसत नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन नागरिकांना असुविधेला सामोरे जावे लागत आहे. याचा दैनंदिन व्यवहारांवरही विपरीत परिणाम होत आहे. ग्राहकांची ये-जा कमी झाल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची तक्रारही पुढे येत आहे. संबंधित विभागाने तात्काळ लक्ष घालून कामाला गती द्यावी, तसेच रस्त्याचे बांधकाम वेळेत आणि दर्जेदार पूर्ण करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सोयगाव अखिल भारतीय बारी संघटनेचे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : अखिल भारतीय बारी संघाच्या वतीने सोयगाव तालुक्यातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या निवडीमुळे सोयगाव बारी समाजाच्या संघटनात्मक बांधणीला नवे बळ मिळाले आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या नेतृत्वाची ही निवड समाजाला योग्य दिशा देणारी ठरणार आहे.अखिल भारतीय बारी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेशजी घोलप व छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष रतनजी फुसे यांच्या अध्यक्षतेखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.यामध्ये सोयगाव



तालुका बारी समाज अध्यक्षपदी श्री. हरिदास रामदास काटोले,सचिवपदी गणेश पांडुरंग आगे,उपाध्यक्षपदी राजू तुकाराम फुसे,

तर उपसचिवपदी दत्तात्रय गोविंदा काटोले यांची निवड करण्यात आली आहे.या नव्या नेतृत्वामुळे समाजातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील, युवकांना संघटित करण्यास चालना मिळेल तसेच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी प्रभावी प्रयत्न होतील, असा विश्वास समाजबांधवांकडून व्यक्त करण्यात येत आहे.बारी समाजाच्या एकतेला बळकटी देत समाजहिताची कामे गतिमान करण्याची मोठी जबाबदारी या पदाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे.या निवडीबद्दल सोयगाव तालुक्यातील बारी समाज बांधव, ज्येष्ठ नागरिक, युवक व मित्रमंडळी यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. समाजाच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# वसंतात बहरला पळसाचा फुलोरा

पळस हे मराठी नाव हिंदीत पलाश तर इंग्रजीत पळसाला फ्लेम ऑफ द. फॉरेस्ट असे म्हणतात. मराठी साहित्यात वेगवेगळ्या कवींनी निसर्गाच्या सानिध्यातील झाडा,वेलींचे, फुला,फळांचे,पक्षांचे सूक्ष्मज्ञान अवगत करून तीन मुख्य ऋतू बरोबर सहा उप ऋतूतील वातावरणातील बदल कवितेत टिपले आहेत. पळस हा वसंत ऋतूत केसरी, रंगाने बहरून गेलेला वृक्ष आहे.कवी काळूदास कनोजे त्यांच्या पळस कवितेत म्हणतात.

लाल फुलांचा फुलोरा
दिवा रानात पेटला
कड्याकपारीत बाई
डोंगर देवानी लावला

रानावनातला भुंगा
मध चाखायला आला
लाल फुलांचा संभार
नववधू बघून लाजला

पाना फुलांमध्ये जणू
बाजार मुंग्यांचा भरला
गोड कोकिळाचा गळा



वरी कावळा विसावला

हिवाळा ऋतू असल्यानंतर फाल्गुन महिन्याच्या आगमनात होळी सनाच्या आधी शिशिर ऋतूत जंगलातील इतर वृक्षांची पानगळ सुरू होते. झाडावरील पिवळी पालवी गळून पडताना हवेत जणू पताकांची उधळणच होताना दिसते. अशा निसर्गरम्य वातावरणात पळस वृक्ष मात्र वसंत ऋतूत केसरी रंगाच्या फुलांनी बहरून गेलेला दिसतो. मराठवाड्यात वेगवेगळी लोकगीत यासंदर्भात प्रसिद्ध आहेत.

वाटेवरचा पळस शेंडीला फुलला
लेक देऊन सोयरा सखा जीव जोडला
केसराचा दांड शेंडीला भरला
माहेरचे वाटेवर नववधू लाजला"

रानात सोनेरी किरणं पडलेली दिसतात. सूर्याची तेजस्वी किरण जणू आशीर्वादच झांडाना पोहोचवतात त्यामुळे हे वातावरण अशाच वेळी लग्न सराईत वाटेने जाणाऱ्या नववधूला आल्हाददायक वाटते. पळस झाड तेच बहर तोच पण अग्नी फुलांचा दिमाख मात्र नवा अशा निसर्गरम्य जंगलात पळस वृक्ष अग्नि दिव्याच्या ज्योतीने पेटून उठल्यासारखा भासतो. ह्या वातावरणाला आकर्षित होऊन वेगवेगळ्या रंगाचे पक्षी झाडाच्या वर खाली जमतात. कावळा,भारद्वाज (काकड कुंबाऱ्या),कोकीळ (कुहू), बुलबुल, सुतार पक्षी, खार या पशु पक्षांची जणू मेजवानीच भरते. अशाच प्रसंगी रानवेलींनी ग्रासलेल्या पळस वृक्षावर अंकुरलेल्या फुलांवर मधमाशी पराग कण गोळा करण्यासाठी धिंगाणा घालते. पळस हे झाड डोंगरमाथ्यावर, दरीखोरीत, तर कुठे पडीक माळरानावर फुलांनी फांद्या लवून आलेल्या मोठ्या प्रमाणात आढळतात. पळसाची पानं तळहाताच्या आकारासारखी जाड असतात. त्याचा उपयोग आदिवासी भागात जेवणासाठी पत्रावळी,सनापावनाला देवाला नैवेद्य (बोनं) दाखवण्यासाठी घरावरील छप्पर शिवण्यासाठी, जळलेल्या लाकडाच्या निखाऱ्यावर (इंगळांवर) भाजी बनवण्यासाठी करतात त्याला आदिवासी भागातील भागात पातोळी म्हणतात. जंगलातील रानमेवा,फळ जमा करण्यासाठी पानाचा डोना बनवतात. सगळीकडे पळसाला पाने तीनच अशी म्हण प्रचलित आहे. पळस फुलांचा उपयोग रंग बनवण्यासाठी करतात पळसाची साल आयुर्वेदिक असल्याने औषध बनवण्यासाठी वापरतात. पळस हे झाड वनस्पती सृष्टी मध्ये बहुगुणी वृक्ष म्हणून मानले जाते.

**श्री. सुभाष कामडी**
**( संशोधक)**

# बेलोना गावाला महावितरणचा ‘शॉक’;पहाटेच धाड टाकून वीज चोरांचा केला पर्दाफाश!

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/ नागपूर विभाग** : सर्वसामान्य आणि प्रामाणिक वीज ग्राहकांना अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळावा, या उद्देशाने महावितरणने कंबर कसली आहे. नरखेड तालुक्यातील बेलोना गावात मंगळवारी पहाटे 6:00 वाजता महावितरणच्या पथकाने गावात धडक देत संशयास्पद 50 ग्राहकांच्या मीटरची कसून तपासणी केली. या धडक मोहिमेमुळे वीज चोरांचे धाबे दणाणले आहेत.

या कारवाईत एकूण ५० संशयास्पद विद्युत जोडण्यांची तपासणी करण्यात आली. ज्यात 6 ग्राहकांना प्रत्यक्ष वीज चोरी करताना रंगेहात पकडले. या ग्राहकांवर वीज कायदा 2003 (सुधारित 2007) च्या कलम 135 अन्वये सुमारे 35,000 रुपयांची अनियमितता उघडकीस आणून दंडात्मक कारवाई करण्यात आली.

काटोल विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक अगाव यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहीमेत सहाय्यक अभियंता शुभम हेडाऊ व नीलेश मेश्राम, कनिष्ठ अभियंता रोहित मेश्राम, सौरभ नैताम वरितेश रामटेके सहभागी झाले होते.

वीज चोरीमुळे वितरण प्रणालीवर अतिरिक्त ताण येतो, ज्यामुळे प्रामाणिकपणे बिल भरणाऱ्या ग्राहकांना कमी व्होल्टेज किंवा तांत्रिक बिघाडाचा सामना करावा लागतो. ही मोहीम केवळ दंडात्मक नसून, प्रत्येक ग्राहकाला हक्काची आणि सुरक्षित वीज मिळावी यासाठीचे एक सकारात्मक पाऊल आहे. महावितरणने स्पष्ट केले आहे की, ग्रामीण भागात विजेची गळती रोखण्यासाठी आणि पारदर्शकता जपण्यासाठी अशा प्रकारच्या मोहिमा भविष्यातही सातत्याने राबवल्या जातील.

वीज चोरी हा केवळ गुन्हा नसून तो सुरक्षिततेसाठीही धोकादायक आहे. नागरिकांनी अधिकृत वीज जोडणी घेऊनच विजेचा वापर करावा, जेणेकरून अपघात टाळता येतील आणि अखंडित सेवा देता येईल, असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# जेव्हा प्राथमिक शाळा आठवू लागते



आजही गावी गेल्यानंतर शाळेच्या समोरच्या रस्त्यावरून जाताना नकळत शाळेकडे लक्ष जातं आणि ते सगळं बदललेलं पाहून आमची ती प्राथमिक शाळा आठवू लागते. ही गोष्ट आहे ऐंशीच्या दशकातील माझ्या शाळेची. त्याकाळी आजच्यासारखे मुलांच्या पालकांना ॲडमिशनचे कौतुक नव्हते. जूनमध्ये शाळा सुरू झाल्या की गुरुजी घरोघरी जाऊन मुलांचा शोध घेत असत. चार ते सात वयोगटातील मुलांची जन्मतारीख १ जूनच असायची. घरी येऊन नाव नोंदणी केली की झालं ॲडमिशन. फी नाही की युनिफॉर्म नाही, कुठल्या कटकटी नाहीत. कापडाच्या पिशवीत एक पाटी-पेन्सिल टाकली की झालं दप्तर.


असंच माझं ॲडमिशन वयाच्या पाचव्या वर्षी इयत्ता पहिलीत झालं. काकांचा मुलगा माझ्यापेक्षा वयाने सहा महिन्यांनी मोठा होता. त्याचं आणि माझं ॲडमिशन एकाच दिवशी झालं आणि शाळा सुरू झाली. गावातील मारवाड्याच्या वाड्यात आमची शाळा भरत असे. तो चौकाचा वाडा आजही आठवतो. मोठ्या तीन खोल्यांत तीन वर्ग बसत असत. पहिली आणि बालवाडी एकत्र, दुसरी-तिसरी एकत्र आणि चौथी एकत्र या तीन वर्गांना शिकवण्यासाठी तीन शिक्षक असत. पहिल्या दिवशी वडील शाळेत सोडायला आले. त्यांनी बाईंच्या हवाली आम्हा दोघांना केले. बाईंनी अंगावरून मायेने हात फिरवला. त्याच क्षणी शाळेची भीती क्षणात पळून गेली. आमच्या नर्मदाबाई साक्षात दुसऱ्या सावित्रीबाईच. पांढऱ्या रंगाची प्रिंटेड नऊवारी साडी नेसलेल्या, डोक्यावरून पदर. छान कपाळावर कुंकू आणि प्रेमळ चेहरा. त्यांनी सर्वांना रांगेत प्रार्थनेसाठी बसवलं. समोरच गुरुजी उभे होते. सहा फूट उंच, गोरापान रंग, लांब नाक आणि कायम चेहऱ्यावर स्मित रेषा. नर्मदाबाई आणि तुळशीराम गुरुजी यांची जोडी लक्ष्मीनारायणासारखी शोभून दिसत असे. पांढराशुभ्र शर्ट, पायजमा, डोक्यावर टोपी घातलेले तुळशीराम गुरुजी समोर येऊन मांडी घालून बसले आणि 'खरा तो एकची धर्म' ही प्रार्थना सुरात म्हणायला सुरुवात केली. त्यांच्या पाठीमागे आम्ही म्हणू लागलो, अशाप्रकारे शाळेचा पहिला संस्कार त्या दिवशी रुजला. प्रार्थनेनंतर बाईंनी सर्वांना पाटी-पेन्सिल काढायला सांगितली आणि मुलांच्या जवळ बसून हातात हात घेऊन बाईंनी पाटीवर श्री गणेशा गिरवून घेतला.

आमच्या शाळेची वेळ सकाळी ७ ते ११ आणि दुपारी २.३० ते ५ अशी असे. आदल्या दिवशी रात्रीच आई तेल लावून घट्ट दोन वेण्या घालून झोपताना डोक्याला कपडा बांधून ठेवत असे. सकाळी उठल्यानंतर तोंड धुवून दूध पिलं की शाळेत जायची घाई होत असे. दुपारी मात्र शाळेत जाऊन बसलं की डुकली यायची. बाईंचे लक्ष गेले की त्या आतल्या रूममध्ये घेऊन जायच्या आणि तिथे सतरंजीवर झोपवायच्या. दुपारची शाळा अर्धी झोपेतच गेली. दुसरीला गेले तेव्हा गावाच्या बाहेर एका छोट्या टेकडीवर प्राथमिक शाळा होती. त्या शाळेला मोठं अंगण होतं. हिवाळ्यात शाळेच्या पटांगणात शाळा भरायची, तर उन्हाळ्यात झाडाखाली. पावसाळ्यात शाळेच्या पत्र्यावर नाचत येणारा पाऊस हवाहवासा वाटायचा. आमच्यासारखाच झाडावर पक्ष्यांचाही चिवचिवाट असायचा. मोकळ्या हवेत, निळ्याशार आकाशाच्या मंडपाखाली असलेली शाळा. कधी चौथी संपली समजलेही नाही. बऱ्याच जणांच्या पायात चप्पलही घातलेली नसायची. मुलं शाळेकडे धावत सुटायची. रस्त्यावर दगड धोंडे असायचे. कित्येक वेळा ठेच लागून पडलं की गुडघे फुटायचे. जखमेवर फुंकर मारून पुन्हा उठायचे आणि शाळेकडे धावायचे. मध्येच शेळ्या, गुरं, तर कधी डोक्यावर शेणाची टोपली किंवा विहिरीवरून पाणी आणणाऱ्या बायका भेटायच्या, तसेच गावातील पुरुष मंडळी पारावर बसलेली असायची. गावातील सर्वच काका-काकू, मामा, मावशी अशा नात्यांनी जोडलेली असायची. त्यामुळे प्रत्येक जण बोलायचे, खुशहाली विचारायचे. हे सर्व पार करत शाळेत पोहोचेपर्यंत प्रार्थनेची वेळ व्हायची. सर्व शाळेतील मुले पटांगणात एकत्रच प्रार्थनेसाठी जमा होत असत. राष्ट्रगीत जन गण मन, भारत माझा देश आहे या दोन प्रार्थना सुरू झाल्या की आजूबाजूचा सारा परिसर त्या प्रार्थनेत सामावलेला असे. प्रार्थनेमुळे शिस्त, देशप्रेम, आपुलकी या भावना आपोआप रुजल्या जात असत. शाळेत सर्व उत्सव साजरे केले जात असत. २६ जानेवारी, १५ ऑगस्टला दोन-तीन दिवस आधीपासून तयारी सुरू असायची. शाळेतील मुलेच सर्व तयारी करत असत. जी मुलं चुणचुनी बोलकी असायची त्यांच्याकडून शिक्षक भाषण पाठ करून घेत असतात. पहिलं व्यासपीठ दुसरीच्या शाळेत असताना मिळालं. त्या काळातील शिक्षक म्हणजे केवळ शिकवणारे फक्त मास्तर नव्हते, तर ते मार्गदर्शक, पालकही होते. वेळप्रसंगी शिक्षाही करायचे आणि चांगले काही केले तर कौतुकाची थाप मारून शाब्बासकीही द्यायचे.

आमचे शिक्षक गणिताचे पाढे, मराठीची कविता तालात म्हणत असल्यामुळे कविता लगेच पाठ होत असत आणि इतिहास म्हणजे कथा सांगितल्यासारखा शिकवत असत. त्यामुळे हे सर्व शाळेतच पक्क होऊन जात असे. चौथीपर्यंत होमवर्क नसायचा, त्यामुळे घरी आलं की मनसोक्त अंगणात खेळायचं. हीच त्या काळातील अध्यापनपद्धती. विज्ञान प्रयोगशाळा नव्हती; पण आकाश, झाडं, विहीर, शेती-हेच जिवंत प्रयोग होते. परगावावरून येणारी मुलं चटणी-भाकरी- भाजी जे काय असेल ते घेऊन यायचे. एखाद्या मुलाकडे भाकरी नसेल, तर तो उपाशी राहायचा नाही. शाळेत कधीच कोणाशी स्पर्धा नसायची. शाळेच्या ओट्यावर अभ्यास, मैदानात खेळ आणि शिक्षकांचं मार्गदर्शन हे सगळं नकळत आयुष्याचे धडे देऊन जायचे. आज आधुनिक इमारती, स्मार्ट फोन आणि डिजिटल शिक्षण आले आहे. पण ऐंशीच्या दशकातील ग्रामीण प्राथमिक शाळेतील माणुसकी, आपुलकी आणि साधेपणा हे मूल्य आज दुर्मीळ झाले आहे. त्या शाळांनी केवळ अक्षरओळख दिली नाही, तर आयुष्याला दिशा दिली. आजही गावातून जाताना एखादी जुनी शाळा दिसली, की मन नकळत थांबतं... आणि त्या कौलारू छपराखालून उमटलेला प्रार्थनेचा सूर पुन्हा कानात घुमू लागतो. त्या काळात ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी इमारत नव्हती, तर ती गावाच्या सांस्कृतिक, नैतिक आणि भावनिक जडणघडणीचं केंद्र होती.

**- लता गुठे**

# गुगल, अमेझॉन, मेटा अन् मायक्रोसॉफ्ट यांची एआय मध्ये अव्वल राहण्यासाठी चढाओढ !




आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) क्षेत्रात वर्चस्व मिळवण्यासाठी जगातील आघाडीच्या टेक कंपन्या अल्फाबेट (गुगल), अमेझॉन, मेटा आणि मायक्रोसॉफ्ट २०२६ मध्ये एकूण ६५० अब्ज डॉलर्स इतकी प्रचंड गुंतवणूक करण्याच्या तयारीत आहेत. हा खर्च प्रामुख्याने डेटा सेंटर्स, एआय चिप्स आणि इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीवर होणार असून, एआय टूल्सच्या स्पर्धेत आघाडी राखणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. तज्ज्ञांच्या मते, ही या शतकातील आतापर्यंतची सर्वात मोठी एआय गुंतवणूक ठरणार असून, प्रत्येक कंपनीसाठी गेल्या १० वर्षांतील सर्वाधिक कॅपिटल स्पेंडिंगचा विक्रम मोडणारा ठरेल. या गुंतवणुकीतून नवीन डेटा सेंटर्स, AI चिप्स, नेटवर्किंग केबल्स, बॅकअप जनरेटर्स, तसेच इतर अत्याधुनिक उपकरणे यांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जाणार आहे. AI बाजार अजून सुरुवातीच्या टप्प्यात असतानाच आघाडी मिळवण्यासाठी कंपन्या ही आक्रमक रणनीती अवलंबत आहेत. AI मधून भविष्यात मोठ्या प्रमाणात कमाई होईल, असा विश्वास या कंपन्यांना आहे. त्यामुळे पारंपरिक कार्यालयीन खर्चात कपात करून डेटा सेंटर्स आणि मोठ्या कॅपिटल प्रोजेक्ट्सकडे निधी वळवला जात आहे. चॅटजीपीटीसारख्या टूल्सशी स्पर्धा करण्यासाठी अधिक सक्षम मॉडेल्स तयार करताना हजारो महागड्या चिप्सची आवश्यकता भासते याचमुळे खर्चाचा हा प्रचंड आकडा समोर येतो.

एकत्रित पाहता हा खर्च ६५० अब्ज डॉलर्स इतका होतो, जो मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ६० टक्क्यांनी अधिक आहे. विशेष म्हणजे, मेटाने तब्बल ६ वर्षांनंतर संशोधनापेक्षा प्रॉपर्टी आणि इक्विपमेंटवर अधिक खर्च केल्याची नोंद झाली आहे. तज्ज्ञांचे मत आहे की AI कम्प्युटिंग हे पुढील मोठे मार्केट ठरणार आहे आणि जो आधी पुढे जाईल तोच सर्वाधिक फायदा उचलणार. डी.ए. डेव्हिडसनचे विश्लेषक गिल लुरिया म्हणतात, या चारही कंपन्यांना हरायचे नाही. म्हणूनच त्या रेसमध्ये पूर्ण ताकदीनिशी उतरल्या आहेत. मात्र, काही तज्ज्ञ खर्चाच्या परताव्याबाबत (रिटर्न) चिंता व्यक्त करत आहेत.

**कंपन्यांनुसार गुंतवणुकीचा तपशील**

अमेझॉन: सुमारे २०० अब्ज डॉलर्स

अल्फाबेट (गुगल): सुमारे १८५ अब्ज डॉलर्स

मेटा: सुमारे १३५ अब्ज डॉलर्स

मायक्रोसॉफ्ट: सुमारे १०५ अब्ज डॉलर्स.

# फॅटी लिव्हर ग्रेड-२ च्या निदानाचा अर्थ काय ?; हा आजार किती धोकादायक ?





आजच्या धावपळीच्या जीवनात फास्ट फूडचे प्रमाण वाढल्याने त्यातच शरीराची हालचाल होत नसल्याने अनेक आजार होत आहेत. त्यात फॅटी लिव्हरच्या प्रकरणातही वाढ होत आहे. अल्ट्रा साऊंड रिपोर्टमध्ये फॅटी लिव्हर ग्रेड-२ चे निदान होणे सामान्य झाले आहे. ग्रेड-२ चे निदान झाल्यानंतर अनेक लोक घाबरतात. त्यांना वाटते हा गंभीर आजार आहे.ग्रेड-२ फॅटी लिव्हर म्हणजे नेमके काय असते ? हा का होतो ? आणि याचा कंट्रोल कसे केले जाऊ शकते. या संदर्भात जाणून घेऊयात...

दिल्लीच्या जीटीबी हॉस्पिटलमध्ये मेडिसिन विभागातील डॉ. अजित कुमार यांनी सांगितले की फॅटी लिव्हर हा कॉमन आजार झाला आहे. मात्र, प्रत्येक व्यक्तीला ग्रेड-२ होत नाही. बहुतांश प्रकरणे ही ग्रेड-१ ची असतात. मात्र, ग्रेड-२ चा अर्थ आजार सुरु झाला आहे आणि याला वेळेवर कंट्रोल करणे गरजेचे आहे. डॉ. कुमार यांनी सांगितले की जेव्हा कोणा व्यक्तीच्या लिव्हरच्या पेशी जास्त फॅट होते, तेव्हा यास फॅटी लिव्हर म्हटले जाते. याच्या विविध ग्रेड असतात. ग्रेड-२ मध्ये जास्त फॅट जमा होते. आधी ही समस्या दारु पिणाऱ्यामध्ये पाहायला मिळाली होती. आता दारु न पिणाऱ्यांमध्येही हा आजार होत आहे.

**फॅटी लिव्हर ग्रेड-२ चा अर्थ काय ?**

डॉ. कुमार यांनी सांगितले की जेव्हा लिव्हरमध्ये फॅट जमते तेव्हा त्यास तातडीने कमी करण्याची गरज असते. या स्टेजमध्ये खान-पान आणि लाईफस्टाईलमध्ये बदल करुनही समस्येवर नियंत्रण करता येते. काही प्रकरणात औषधाची देखील गरज असते. परंतू बहुतांशी लोकात ही स्टेथ सहज नियंत्रणात येते. परंतू तुम्ही जर याकडे दुर्लक्ष केले तर पुढे जाऊन लिव्हर सिरोसिस पासून ते लिव्हर फेल होईपर्यंत परिस्थिती उद्भवू शकते.

फॅटी लिव्हर ग्रेड-२ असा टप्पा आहे. ज्यात आजाराला नियंत्रित देखील करता येते. परंतू अनेक लोक याला हलक्यात घेतात आणि खाण्यापिण्याचे नियम पाळत नाहीत, त्यामुळे पुढे जाऊन हा आजार गंभीर स्वरुप धारण घेऊ शकतो असे डॉ. कुमार यांनी म्हटले आहे.

**फॅटी लिव्हर ग्रेड-२ कशामुळे होत असतो ?**

जास्त तळलेले पदार्थ खाणे

जंक फूड खाणे

लठ्ठपणा आणि पोटाची अतिरिक्त चरबी

हाय कोलेस्ट्रॉल

एक्सरसाईज न करणे

**फॅटी लिव्हर ग्रेड-२ चे लक्षण काय असतात?**

कायम थकवा येणे

पोटाच्या उजव्या बाजूला जडपणा आणि हलके दुखणे

भूक कमी लागणे

वजन वेगाने वाढणे

अपचनाची समस्या

**फॅटी लिव्हर ग्रेड-२ काय केल्यास औषधांची गरज लागणार नाही**


रोज किमान ३० मिनिटे एक्सरसाईज करा

वजन घटवा

फास्ट फूडपासून दूर रहा

हिरव्या भाज्या आणि मौसमानुसार फळांचा आहारात समावेश करावा.

# आत्मबोधाचा शाश्वत आनंद



मातेच्या गर्भात असताना जीवाला स्वस्वरूपाची जाणीव असते . पण गर्भामध्ये " सोहं सोहं " करणारा हा जीव जन्माला आल्यानंतर मात्र त्याला देहबुद्धी प्राप्त होते आणि " कोहं कोहं " असा आक्रोश करायला लागतो. मायेच्या प्रभावामुळे परमात्म्यापासून हा जीव दूर जातो. मी म्हणजे देहच याच भ्रमात तो जीवन जगतो आणि अहं मध्ये बद्ध होतो. स्वताचा अहं कुरवाळण्यात आनंद मानणारा हा जीव या भवसागरातून पार कसा होणार ? मायेत गुरफटलेल्या आणि स्वस्वरूप विसरलेल्या अशा या जीवाला या मायानदीतून पार व्हायचे असेल तर त्याचा उगम ज्याठिकाणी आहे त्याठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करायला हवा. सूक्ष्माकडून स्थूलाकडे जाणे हा जरी मायेचा स्वभाव असला तरी त्याच्या प्रभावापासून वाचण्यासाठी नदीच्या प्रवाहा बरोबर वाहत न जाता त्याच्या विरुद्ध दिशेने पोहत जाऊन भगवंता चरणी विलीन होणे हेच अंतिम ध्येय असायला हवे.या मोहरूपी मायेपासून अत्यंत सावधपणे जीवाने स्वत:ला बाजूला नेऊन परमेश्वराचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करायला हवा. आत्मा हाच ईश्वर आहे आणि हे जाणून घ्यायचे असेल तर प्रथम अहंचा त्याग करणे गरजेचे आहे. देहबुद्धी मध्ये अडकलेला जीव कनिष्ठ देवांमध्ये अडकतो अन मुख्य देवापासून दूर राहतो.

मानवी मन हे अत्यंत चंचल आहे पण या मनाचा, प्रवृत्तीचा जर अभ्यास केला तर सत पासून जन्माला आलेले मन मूळात सज्जनच आहे. पण कल्पनेमध्ये रमणारे चंचल मन आपल्या मूळ प्रवृत्ती पासून दूर जाऊन इतर गोष्टींमध्येच रमते. आणि अशाश्वत जगात रमलेले मनच जीवाला शाश्वत सुखापासून दूर ठेवते म्हणून मनालाच उत्तम विचार करायला प्रवृत्त केले पाहिजे. उत्तम विचार, उत्तम संगत, उत्तम चिंतन मननाची सवय लावून परमेश्वर प्राप्ती कशी करून घ्यावी हे आपल्याला श्रीमद्भगवद्गीता, दासबोध या ग्रंथातून शिकायला मिळते. शुद्धज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी मानवी मनावर जो अज्ञानाचा पडदा आहे तो दूर झाला पाहिजे. खरे तर जीव आणि ईश्वर यामध्ये द्वैत नाही पण मायेमुळे जीवाला ईश्वराचे विस्मरण झाले आहे. 'मी म्हणजे देह' आणि माझ्यापेक्षा ईश्वर काही वेगळा हा भ्रम जीवाला झाला. परंतु जीवशिव हे एकरूपच आहेत ही एकरूपत्व जाणून घेण्यासाठी जीवाने भक्तिमार्गाचा अवलंब करावयास हवा.

माणसाला आपल्या मूळ स्वरूपाचा शोध घ्यावयाचा असेल तर त्यासाठी मायेचा त्याग करावा लागेल. भगवंताचे कर्तुत्व विलक्षण आहे तसेच ही माया मोठी विचित्र आहे. या मायेमध्ये रमल्यामुळेच माणसाचे मन अस्थिर राहते. माणसाचे मन कायम कल्पनेमध्ये रमून जाते. यामुळे त्याचे मन कधीच एकाग्र होऊ शकत नाही.

मनालाच सतत भगवंताचे चिंतनात रमवायला हवे.

इंद्रियांच्या पातळीवर विषयसुखाचा विचार करत राहते. तेव्हा ती माया माणसाच्या बंधनास अथवा पुनर्जन्मास कारणीभूत ठरते. पण मनातील विचार भगवंतासंबंधीचे असतील तर हळूहळू हेच मन साधकाला निर्विचार करून हीच माया साधकाला बंधनातून मुक्त करण्यास उपयोगी ठरू शकते. त्यासाठी साधकाने एकांतात राहून सतत साधना करणे गरजेचे आहे. अहंकार आणि वासना यामुळे माणूस दृश्य जगातील सगळ्यांना माझे माझे म्हणत राहतो. इतरांकडून अपेक्षा करीत राहतो आणि इतरांच्या अपेक्षापूर्ती करू शकत नाही . अशा या विचित्र चक्रात तो सापडतो आणि या अपेक्षापूर्तीच्या खेळात मनुष्य अधिकाधिक मायेत गुरफटत जातो. या चक्रातून सुटण्यासाठी अहंकाराचा आणि वासनेचा त्याग करायला हवा. देहबुद्धी ते आत्मबुद्धी साध्य करण्यासाठी साधना उपासना याच्या माध्यमातून शाश्वत आनंद प्राप्त करून घ्यायला. सर्व सुखाचा सागर असणा-या भगवंताला आपले सर्वस्व मानले तरच या मनाला खरा शाश्वत आनंद प्राप्त होणार आहे. मन हे सिद्धीचे कारण आहे . मनाच्या प्रसन्नतेवर अनेक गोष्टी अवलंबून आहेत हे जाणून तसेच मनाचे सामर्थ्य ओळखून मनाला विवेकाने आवर घालून त्याला रामरूपी करायला हवे तेंव्हाच आत्मबोधाचा शाश्वत आनंद प्राप्त होईल.